॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

मोरोपंती आर्या-वृत्त

श्रीमद्भगवद्गीते, वर्णावें आदरें तुला नमुनी ।
सर्वोपनिषत्सारे माते, तुज पाहती तुला न मुनी ॥
धर्मक्षेत्रीं कुरुच्या क्षेत्रीं मिळुनी करावया समर ।
माझे अणि पांडूचे करिती तें सांग संजया कुमर ॥ १-१॥
तेव्हां पांडुसुतांची पाहुन सव्यूह सैन्यरचना ते ।
वेगीं द्रोणाजवळी येउनि बोले नृपाळ वचनातें ॥ १-२॥
हे आचार्या स्वामी पांडवसेना पहावया ज्ञानें ।
धृष्टद्युम्नें व्यूहा रचिलें शिष्यें तुझ्याच सुज्ञानें ॥ १-३॥
भीमार्जुनसम येथें दिसती धन्वी समग्र शूर रथी ।
सात्यकि विराट आणिक द्रुपदादिक हे महारथातिरथी ॥ १-४॥
तो धृष्टकेतु आहे काशीश्वर आणि चेकितान असे ।
दिसती वीर पहा हे पुरुजित्सह शैब्यकुन्तिभोज असे ॥ १-५॥
अतिवीर्य उत्तमौजा विक्रमशाली तसा युधामन्यू ।
सर्वही महारथी ते पांचाळीचे कुमार अभिमन्यू ॥ १-६॥
ऐकावें द्विजवर्या नायक माझ्या विशिष्ट सैन्यातें ।
संज्ञार्थच मी वदतों जाणावें लोकमान्य मान्यातें ॥ १-७॥
एक तुम्ही अणि भीष्म प्रौढ कृपाचार्य आणि हा कर्ण ।
तो सौमदत्ति आणिक अश्वत्थामा गुणाकर विकर्ण ॥ १-८॥
आणिक शस्त्रास्त्रीं हे बहूत जे शूर निपुण समरा या ।
माझ्या अर्थासाठीं धरुनी आलेहि मानस मराया ॥ १-९॥
दिसती अपूर्ण अमुची भीष्में रक्षोनि भीम सेना ही ।
पूर्ण दिसे पार्थाची अनुसरतां जाण भीमसेनाही ॥ १-१०॥
अपुल्या अपुल्या स्थानीं तिष्ठति युद्धीं धरोनि दृढ लक्षा ।
अवघे मिळोनि एका भीष्मालागीं जपोनि संरक्षा ॥ १-११॥
ऐकुनियां नृपवचना त्यासि कराया तई प्रमोदातें ।
गर्जोनि सिंहनादें करि तो कुरुवृद्ध शंखनादातें ॥ १-१२॥
मग शंखासह भेरीपणवानकगोमुखादि रव दाटे ।
जेणें शब्दें‌करुनी पृथ्वी आकाश सर्व कोंदाटे ॥ १-१३॥
बैसुनि ते श्रेष्ठ रथीं संयुक्त श्वेतवर्ण हय ज्याशी ।
माधव आणिक पांडव वाजविती तेचि दिव्य जलजाशी ॥ १-१४॥
बीभत्सु देवदत्ता वाजवि तो कृष्ण पांचजन्यासी ।

वाजविलें पौंड्रासी भीमें जो नित्य सिद्ध युद्धासी ॥ १-१५ ॥
राजा अनंतविजया वाजवुनी जो करी महाघोषा ।
सहदेव नकुळ तैसा वाजवि मणिपुष्पकाभिध सुघोषा ॥ १-१६ ॥
काश्यें शिखंडिनेंही त्या केला पृषदराजशूरानें ।
सात्यकिवीरें आणिक धृष्टद्युम्नें विराटवीरानें ॥ १-१७ ॥
द्रुपदें अभिमन्यूनें पृथक् पृथक् द्रौपदीय तनुजांनीं ।
वाजवुनी शंखांतें भरिलीं दाही दिगंतरें ज्यांनीं ॥ १-१८ ॥
त्या धार्त्रराष्ट्रचित्तीं लागुन तो घोष तीव्र धाकाशीं ।
झाला तुंबळ ध्वनि हा भरिला पृथ्वींत आणि आकाशीं ॥ १-१९ ॥
वीर उभे अवघेही करावयालागिं शस्त्रसंपातें ।
पाहुनि अर्जुन तेव्हां हातीं घेवोन सज्ज चापातें ॥ १-२० ॥
बोले श्रीकृष्णासी अर्जुन तेव्हां करावया आजी ।
दोहीं सेनेमध्यें ने माझा रथहि अच्युता आजी ॥ १-२१ ॥
जोंवरि अवघा दृष्टीं युद्धोत्सुक हा उभा रिपुग्राम ।
पाहिन विचारुनीयां करुं मी कवणा झटोन संग्राम ॥ १-२२ ॥
पाहिन अवघे येथें आले युद्धासि वीर लवलाहें ।
दुर्मति सुयोधनाच्या युद्धीं जे इच्छिती प्रियाला हे ॥ १-२३ ॥
ऐकुनि ऐशा वचना युद्धीं जे बोलिला गुडाकेश ।
दोहीं सेनेमध्यें स्थापी नेऊन रथ हृषीकेश ॥ १-२४ ॥
भीष्मद्रोणांसंनिध सर्व नृपांच्या समीप विश्वगुरू ।
बोले ऐसें पार्था आजि मिळाले पहाच सर्व कुरू ॥ १-२५ ॥
पाहे अर्जुन तेथें मातुल आचार्य पुत्रपौत्रांतें ।
त्या पितृपितामहांतें बन्धूंतें आणि इष्टमित्रांतें ॥ १-२६ ॥
श्वशुरांतें सुहृदांतें तेव्हां दोन्हीहि सैन्यसिंधूंतें ।
कुंतीचा तो नंदन पाहुनियां सिद्ध सर्व बंधूंतें ॥ १-२७ ॥
मानुनि विषाद चित्तीं बोले होवोनियां कृपाव्याप्त ।
कृष्णा पाहुनि त्यांतें जे युद्धोद्युक्त सर्वही आप्त ॥ १-२८ ॥
गात्रें खिन्न समस्तें मुख शुष्कहि आणि सर्व तनु कंपा ।
पावें रोमांचित तनु उपजलि चित्तांत तीव्र अनुकंपा ॥ १-२९ ॥
हस्तापासुनि गळतें गांडिव आला तनूशि हिंवजाळ ।
बैसाया शक्ति नसे भ्रमवी चित्तास मोहजंजाळ ॥ १-३० ॥
युद्धीं विपरीतासच पाहतसें केशवा निमित्तातें ।
वधुनी स्वजना न दिसे मातें कल्याण राज्यमत्तातें ॥ १-३१ ॥
इच्छीना मी कृष्णा गोविन्दा राज्य भोगविजयांशी ।
न लगे स्वजनवधें मज जीवित आणि राज्यभोग विजयाशी ॥ १-३२ ॥
जोडावें ज्यांसाठीं राज्यसुखा भोग तेचि हे निधना ।

आले सिद्ध मराया त्यागुनियां प्राण गेह मित्र धना ॥ १-३३ ॥
आचार्या आणि मातुल पौत्र पितामहहि पुत्रही पितर ।
शालक आणि श्वशुरहि संबंधी इष्टमित्र आणि इतर ॥ १-३४ ॥
मारोत मला अवघे परि मी यांलागिं मारिना देवा ।
त्रिभुवनराज्यास्तवही पृथ्वीचा तेथ कायसा केवा ॥ १-३५ ॥
या धार्तराष्ट्रघातें होइल कैसा जनार्दना तोष ।
असतांहि आततायी वधितां यांतें घडेल मज दोष ॥ १-३६ ॥
यास्तव न वधावे म्यां निज बंधू धार्तराष्ट्र हे आप्त ।
निजजनघातें कैसें होइल सुख माधवा मला प्राप्त ॥ १-३७ ॥
जरि हें लोभावेशें पाहीना तो स्वकीयजनघातें ।
मित्रद्रोहाघातें तैसें दुस्तर कुलक्षयाघातें ॥ १-३८ ॥
परि म्यां देवा कैसें पापापासोनियां न परतावें ।
स्वकुलक्षयदोषें जें कैसें म्यां सत्पथीं न वर्तावें ॥ १-३९ ॥
बुडती कुलक्षयानें कुळिंचे प्राचीन धर्म हे सारे ।
धर्माच्या नाशानें न शिरे वंशीं अधर्म कैसा रे ॥ १-४० ॥
शिरुनी अधर्म कृष्णा वंशींच्या दूषिता स्त्रिया करितो ।
वनिता दूषित होतां होतो उत्पन्न वर्णसंकर तो ॥ १-४१ ॥
होतो कुलघ्न पुरुषा नरकप्रद शीघ्र वंशसंकर कीं ।
मग पिंडोदकलोपें पडती पितृगण समस्तही नरकीं ॥ १-४२ ॥
यावरि वंशघ्नांची संकररीती अचाट दुष्कर्म ।
होतां तेचि करीती मुळिंचे उत्सन्न जातिकुळधर्म ॥ १-४३ ॥
ज्या मनुजाच्या वंशीं याउपरि उच्छिन्न धर्म ते असती ।
ऐकियलें ऐसें कीं त्याला नरकामधें सदा वसती ॥ १-४४ ॥
आश्चर्य हेंचि आतां आम्ही करणार पापसिंधूतें ।
राज्यसुखाचे लोभें माराया सिद्ध सर्व बंधूंतें ॥ १-४५ ॥
मी प्रतिकार कराया यांवरि न धरीन शस्त्र हा नेम ।
हे धार्तराष्ट्र मातें वधितां शस्त्रें दिसे महा क्षेम ॥ १-४६ ॥
बोलुनि ऐसें युद्धीं टाकुनि तत्काळ पार्थ शरचाप ।
बैसे उगला स्वरथीं पावुनि चित्तांत शोकसंताप ॥ १-४७ ॥

संजय म्हणे किरीटी साश्रु सखेदहि बहू कृपावंत ।
होतां मधुसूदन तो बोले वचनें तयासि भगवंत ॥ २-१ ॥
ऐशा विषमावसरीं आर्यपथ स्वर्ग कीर्ति लोटून ।
पार्था नीचाश्रित हें आलें कश्मल तुलाच कोठून ॥ २-२ ॥
उचित क्लीबत्व नव्हे निजशौर्याची नको करूं तूट ।
क्षुद्र मनोदौर्बल्या त्यजुनी पार्था परंतपा ऊठ ॥ २-३ ॥
पार्थ म्हणे म्यां ज्यांच्या सन्निध वंदोनि हस्त जोडावे ।

त्या भीष्म द्रोणावरि कैसे बाण प्रचंड सोडावे ॥ २-४ ॥
सुमहानुभाव गुरुसी न वधुनि उदरार्थ भैक्ष्य मागावें ।
न स्वार्थकाम गुरुच्या हननें रुधिराक्त राज्य भोगावें ॥ २-५ ॥
जय कीं अपजय बरवा झाला आम्हांसि हाचि संदेह ।
ते धार्तराष्ट्र ठेले त्यागावा त्यांचिया वधें देह ॥ २-६ ॥
कार्पण्यदोषहत मी शरणागत शिष्य धर्मसंमूढ ।
पुसतों श्रेय सुनिश्चित शिक्षावें मज असेल जें गूढ ॥ २-७ ॥
न दिसे शोक हरीतें शोषे जो इंद्रियें महा प्राज्य ।
जरिही पद इंद्राचें मिळेल असपत्नभूमिचें राज्य ॥ २-८ ॥
यापरि वदतां वदतां वरिलें मौनें तदा गुडाकेशा ।
न करीं गोविंदा मी युद्ध असें बोलुनी हृषीकेशा ॥ २-९ ॥
दोन्ही सेनेमध्यें यापरि सविषाद देखुनी पार्थ ।
बोले हास्य करूनी मधुसूदनजी प्रगल्भरूपार्थ ॥ २-१० ॥
करुनी अशोच्य विषयीं शोकातें वदसि सुज्ञवादातें ।
अगतासुगतासूंतें करिती पंडित कदा न खेदातें ॥ २-११ ॥
मी आणि तूंहि पार्था सर्वहि हे भूमिपाळ सेना ही ।
नव्हतों मागें आम्हीं तैसेचि पुढें नसो असें नाहीं ॥ २-१२ ॥
कौमार यौवन जरा येती जाती पृथासुता वीरा ।
तैसें देहांतरही न करी चित्तांत मोह त्या धीरा ॥ २-१३ ॥
सुखदुःखशीतऊष्णप्रद मात्रास्पर्श भारता पाहीं ।
साहीं ज्ञानबळानें हें सर्व अनित्य आगमापायी ॥ २-१४ ॥
या विषयींची पीडा नोहे ऐसी असे जया युक्ती ।
तो सम दुःखसुखींही धीरहि तो पावतो महामुक्ती ॥ २-१५ ॥
लटिक्या सत्यत्व नसे नाहीं मिथ्यत्व तेंवि सत्याला ।
हा निर्णय दोहींचा आहे बा विदित तत्त्ववेत्त्यांला ॥ २-१६ ॥
व्यापी सर्व जगातें पार्था तूं जाण तेंचि अविनाशी ।
वदतों हेंचि तुला मी कोण अशा अव्यया तया नाशी ॥ २-१७ ॥
अविनाशी जीवाच्या होय तनूलागिं भारता मरण ।
यास्त्व कुंतीतनया तूं करि पार्था स्वधर्मकाम रण ॥ २-१८ ॥
आत्मा वधी म्हणे जो आणि वदे जो वधोनिही तो घे ।
न वधी न मरे आत्मा करिती अध्यास मूर्ख ते दोघे ॥ २-१९ ॥
आत्मा न होय न मरे न कधीं होवोनि मागुता होतो ।
शाश्वत पुराण अज जो न मरे मरतां शरीर आहे तो ॥ २-२० ॥
अज अव्यय अविनाशी आत्मा ऐसें मनांतचि विचारी ।
मग तो पुरुष कसारे पार्था कोणासि मारवी मारी ॥ २-२१ ॥
जैसा नर कौंतेया नूतन घेतो त्यजोनि जीर्णपट ।

तैसा देह नवा घे देहीही टाकुनी जुना निपट ॥ २-२२॥
शस्त्रें छिन्न नव्हे हा आत्मा तैसाच पावकें न जळे ।
न करी शुष्कहि वायू करवेना आर्द्रही तयास जळें ॥ २-२३॥
अच्छेद्य अदाह्य पुरुष किति तुज उघडोनि सांग बा वरणूं ।
अक्लेद्य अशोष्य तसा नित्याचळ आद्य सर्व आवरणू ॥ २-२४॥
अव्यक्ताचिन्त्य पुरुष अविकारी वदति जाण सुश्लोक ।
जाणुनि यास्तव ऐसें न करीं पार्था कदापि तूं शोक ॥ २-२५॥
नित्य मरे जन्मे तो जीव असें मानिसी जरी थोक ।
हे विजय महाबाहो न करीं चित्तीं तथापि तूं शोक ॥ २-२६॥
झाला निश्चित मरतो निश्चित मेलाहि जन्मतो लोक ।
न टळें हें कोणासी यास्तव न करीं कदापि तूं शोक ॥ २-२७॥
मायेपासुनि सुटती भूतें तीमाजि मागुतीं दडती ।
मध्यें उगीच दिसती यासाठीं सुज्ञ कोणते रडती ॥ २-२८॥
आश्चर्यापरि कोणी ऐकुनि नेणे तसाचि बा पाहे ।
कोणी ऐकुनि नेणे आत्म्याशी जाणती न बापा हे ॥ २-२९॥
देहीं सकळांच्याही पार्था देही अवध्य हें घोक ।
यास्तव भूतांविषयीं न करीं सखया मनांत तूं
शोक ॥ २-३०॥
निजधर्मावरि दृष्टी देउनि पार्था भिऊं नको युद्धा ।
युद्धाविण तों क्षत्रिय न पवे कल्याण हे धरीं श्रद्धा ॥ २-३१॥
आयासाविण मिळतां स्वर्गाचें द्वार युद्ध हें उघडें ।
मानावें सौख्य मनीं पार्था क्षत्रियजनें महा सुघडें ॥ २-३२॥
आतां स्वधर्म अपुला या संग्रामा न आजि आदरितां ।
धर्माच्या नाशातें कीर्तीच्या करुनि पावशी दुरितां ॥ २-३३॥
शाश्वत पार्था तूझीं भूतें हीं वर्णितील अपकीर्ति ।
संभावितासि अपयश मरणाधिक जाच देतसे अंतीं ॥ २-३४॥
पार्था महारथी हे म्हणतिल तुजला रणासि हा भ्याला ।
ज्यांसी मान्य सदा तूं भासेल लघुत्व यांचि सभ्यांला ॥ २-३५॥
बोलूं नयेचि जें तें पार्था तुज बोलतील रिपु दुष्ट ।
निंदिति तव सामर्थ्या याहुनि आणीक कोणते कष्ट ॥ २-३६॥
मरसिल तरि स्वर्ग मिळे जिंकिशि तरि भोगिशील हे धरणी ।
यास्तव ऊठ सख्या तूं हो दृढनिश्चय धरूनि सिद्ध रणीं ॥ २-३७॥
करुनि समान जयाजय लाभालाभास सौख्यसंतापा ।
मग करि योग रणाचा येणें पार्था न पावसी पापा ॥ २-३८॥
कथिली सांख्याविषयीं यापरि मी सांगतों मती परिस ।
जी कर्मबद्ध न करी कोण दुजी श्रेष्ठ युक्ति यापरिस ॥ २-३९॥

जेथें अनुक्रमाचा न नाशही प्रत्यवायही कांहीं ।
स्वल्पहि धर्म पहा हा राखी वारुनि भया अनेकांहीं ॥ २-४०॥
व्यवसायात्मिक बुद्धी धरि पार्था एक तूं अविच्छिन्न ।
अव्यवसायी जे नर त्यांच्या बुद्धी अनंतही भिन्न ॥ २-४१॥
अज्ञानी जे मानव पुष्पितवाणीच हे तयां मान्य ।
जे वेदवादरत ते म्हणती नाहींच याविना अन्य ॥ २-४२॥
जी जन्मकर्मफलदा कर्में बहुला सकाम मानव तो ।
भोगैश्वर्य गती जे स्वर्गार्थी बहु तिलाच मानवतो ॥ २-४३॥
पुष्पितवाणिस भुलले भोगैश्वर्यप्रसक्ततेविषयीं ।
व्यवसायात्मिक बुद्धी त्याला नोहे समाधिच्या विषयी ॥ २-४४॥
सत्त्वस्थ द्वंद्वरहित निर्गुण हो त्रिगुणविषय हा वेद ।
जितचित्ता कौंतेया योगक्षेमीं न वाहिजे खेद ॥ २-४५॥
कूपादि उदकपानीं जीं कार्यें तीं महाऱ्हदीं घडती ।
तैशीं वेदोक्तफळें ब्रह्मज्ञान्यासि सर्व सांपडती ॥ २-४६॥
कर्मीं अधिकार असो न कधीं त्याच्या फळीं असो पार्था ।
न फळासी कारण हो न त्यागावेंच कर्मरूपार्था ॥ २-४७॥
योगस्थ होउनि करीं कर्मा सोडुनि धनंजया सुमता ।
सिद्धि असिद्धी सम त्या मानीं तूं जाण योग तो समता ॥ २-४८॥
जाणुनि सुबुद्धि योगहुनि पार्था कर्मयोग तो अवर ।
जा बुद्धीस शरण बा कृपणफळेच्छेस तूं कदा न वर ॥ २-४९॥
जो बुद्धियुक्त नर तो टाकी दुष्कृत सुकृत उपशल्य ।
यास्तव योगासि करीं योगचि तो जाण कर्मकौशल्य ॥ २-५०॥
जे बुद्धियुक्त नर ते टाकुनि कर्मा फलानुसंधानें ।
पावति अनामयपदा होउनियां मुक्त जन्मबंधानें ॥ ५१॥
जेव्हां बुद्धि तुझी हे पार्था उतरेल मोहमय कलिला ।
श्रोतव्यश्रुत तेव्हां टाकिल पावोनि भक्तिची कलिला ॥ ५२॥
श्रुतिविप्रतिपन्ना तव बुद्धि समाधीमधींच साअचळ ।
जेव्हां स्थिर होईल बा तेव्हां योगासि पावसी अचळ ॥ २-५३॥
चित्तैकाग्र्यरताची स्थितधीची केशवा कवण भाषा ।
स्थितधी कसा असे तो बोले चालेहि सांग निर्दोषा ॥ २-५४॥
टाकी जेव्हां पार्था चित्तापासूनि सर्व कामासी ।
संतुष्टात्मा तेव्हां धरी स्थितप्रज्ञ योग्य नामासी ॥ २-५५॥
दुःखीं उद्विग्न नव्हे निस्पृहहि सुखीं असा दिसेल तधीं ।
पार्था क्रोधादिरहित जाणावा साधुनीं जगीं स्थितधी ॥ २-५६॥
पावुनि शुभाशुभांसहि हर्षद्वेषोर्मिची नदी उतरे ।
कोठें स्नेह नसे ज्या त्याची प्रज्ञा सदा प्रतिष्ठित रे ॥ २-५७॥

विषयांतुन आकर्षी इंद्रियगण जेविं अवयवां कूर्म ।
तोचि प्रतिष्ठितमती योगाचें जाणतो महा वर्म ॥ २-५८॥
तों तों वाढे गोडी जों जों टाकीच विषय आहार ।
जेव्हां ब्रह्म कळे बा गोडीचा तंच होय संहार ॥ २-५९॥
जरिहि साधक मोठा ज्ञानी पुरुष प्रयत्नही करितो ।
तरिहि मथुनि हटानें इंद्रियगण त्याचिया मना हरितो ॥ २-६०॥
युक्त असावें मत्पर ज्या सर्वेंद्रियगणासि संयमुनी ।
इंद्रियगण वश त्याला प्रतिष्ठितप्रज्ञ जाण तोचि मुनि ॥ २-६१॥
विषयध्यानें पुरुषा होतो विषयीं धनंजया संग ।
संगापासुनि काम क्रोध तयाचा उठेचि अनुसंग ॥ २-६२॥
क्रोधापासुनि मोहहि मोहापासुनि उठे स्मृतिभ्रम तो ।
स्मृतिनाशें मति नाशे प्रज्ञानाशें भवभ्रमीं श्रमतो ॥ २-६३॥
स्वाधीनइंद्रिय जरी विषयां भोगावयासि उद्योगी ।
रागद्वेषाविण मज जिंकुनि पावे प्रसाद मद्योगी ॥ २-६४॥
होतां प्रसाद चित्तीं निरसी दुःखा समूळही सुज्ञ ।
चित्त प्रसन्न ज्याचें जाणावा तो प्रतिष्ठितप्रज्ञ ॥ २-६५॥
बुद्धि अयुक्तास नसे ध्यानहि पार्था नसे अयुक्ताला ।
ध्यानाविण शांति नसे होइल सुख कोठुनी अशांताला ॥ २-६६॥
धांवति विषयीं करणें ज्यांचें घे धांव चित्त त्यामाघें ।
हारी मग मन त्याचें जैसी ने नाव अंबुच्या वोघें ॥ २-६७॥
यास्तव ज्याणें दमिलीं विषयापासोनि इंद्रियें सकळें ।
त्याची प्रतिष्ठित मती योगाची युक्ति सर्व ज्यास कळे ॥ २-६८॥
सकळां भूतांची जे निशा तयेमाजि संयमी जागा ।
जागति भूतें जींत द्रष्टमुनीची निशा पहा जागा ॥ २-६९॥
जलपूर्णा सिंधुमधीं न शिरायाला जलौघ तो मुकतो ।
कामौघ तेविं ज्यामधिं पावे तो शांतिला न कामुक तो ॥ २-७०॥
टाकुनि सर्वहि कामा निस्पृह होउनि जनांत जो जोगी ।
निर्मम निरहंकारी पावे तो शांति साधनाजोगी ॥ २-७१॥
धरि जो ही ब्राह्मी स्थिति मोह न त्या न मिति त्यासि निर्वाण ।
अंतींही धरि जो ही पावेल ब्रह्म तोचि निर्वाण ॥ २-७२॥

हे केश्वा तुलाही कर्माहुनि बुद्धि भासती थोर ।
तरि कां जनार्दना मज करवीशी कर्म हें महाघोर ॥ ३-१॥
संदिग्ध बोलसी कां बुद्धिस जो ठकविणार त्यावाणी ।
पावें मी श्रेय असी निश्चित मज सांग एक तूं वाणी ॥ ३-२॥
लोकीं द्विविधा निष्ठा सांगितली निश्चितार्थ मीं वदुनी ।

कर्मी जे त्यां कर्म ज्ञान्यांसी ज्ञानयोग हे दोनी ॥ ३-३॥
नैष्कर्म्य तो न पावे कर्माचा जो करी अनारंभ ।
केवळ संन्यासाने पुरुषास न मुक्तिचा समारंभ ॥ ३-४॥
कर्माविण कोणीही क्षणभरि पार्था न राहता अवश ।
करितो कर्म सदाही प्रकृतिगुणालागिं होउनी वश्य ॥ ३-५॥
कर्मेंद्रियांसि दमुनि विषय स्मरतो मनामधें गूढ ।
म्हणती त्यातें ज्ञानी मिथ्याचारी सदा महामूढ ॥ ३-६॥
तोचि विशिष्टहि पार्था अंत:करणे दमोनिअ करणें ।
कर्मेंद्रियेंचि ज्याला त्यागुनि आसक्ति कर्म तें करणें ॥ ३-७॥
कर्म बरें न अकर्म स्वीकारीं कर्म अवशमात्राही ।
कर्म त्यजितां पार्था न चले क्षणभर शरीरयात्रा ही ॥ ३-८॥
यज्ञार्थाविण करितां कौंतेया कर्म तें जना बाधी ।
नि:संग कर्म हरिच्या प्रीत्यर्थ करावया असो बा धी ॥ ३-९॥
यज्ञासह जन निर्मुनि बोले विधि त्यांस हें असे स्पष्ट ।
यज्ञें प्रसवा तुम्हीं तुमचा पुरवील काम हा इष्ट ॥ ३-१०॥
यज्ञें देवासि तुम्ही देव तुम्हांला परस्परें भावा ।
अन्योन्यभावनेनें पावाल श्रेय धरुनियां भावा ॥ ३-११॥
यज्ञीं भावित सुर ते देति तुम्हां इष्ट भोग ते थोर ।
देवीं जें दिधलें तें त्यांसि न देतांचि खाय तो चोर ॥ ३-१२॥
निर्दोष सर्वथा ते सेविति जे नित्य यज्ञअवशिष्ट ।
भक्षिति केवळ अघ ते यज्ञाविण भक्षिती अती मिष्ट ॥ ३-१३॥
अन्नापासुनि भूतें पर्जन्यापासुनीच तें अन्न ।
क्रतुपासुनि पर्जन्य क्रतु तो कर्माहुनी नसे भिन्न ॥ ३-१४॥
कर्म ब्रह्मज तेंही अक्षरभव जाणिजेत समयज्ञीं ।
सर्वगत ब्रह्महि जें प्रतिष्ठित असे सदैव तें यज्ञीं ॥ ३-१५॥
एवं परंपरागत जो कोणी हा न चालवी बोध ।
इंद्रियनिरत अघायू त्याचें आयुष्य सर्वथा मोघ ॥ ३-१६॥
आत्मरत आत्मतृप्त क्षत्रियवर्या जगामधीं आर्य ।
जो आत्मतुष्ट पार्था नाहीं त्यालागिं कोणतें कार्य ॥ ३-१७॥
कार्यें अर्थें कार्यें अनर्थ जो या त्यजीच उभयांस ।
सर्वांभूतीं पार्था नाहीं अर्थ व्यपाश्रयें त्यास ॥ ३-१८॥
यास्तव सक्त न होतां अवश्य जें कर्म त्याविना न रहा ।
सक्त न होतां कर्मा करितां ब्रह्मास पावतो नर हा ॥ ३-१९॥
जनकादिकही कर्मे झाले ते सिद्ध पावले शर्म ।
जनसंग्रहाकडेही पाहुनि पार्थ करीं सदा कर्म ॥ ३-२०॥
चालति जन त्या मार्गें घालिति तो श्रेष्ठ पांडवा धारा ।

ते जें प्रमाण करिती वर्तति जन त्या वरोनि आधारा ॥ ३-२१॥
त्रिभुवनिं कर्तव्याची माझ्या कांहीं मनीं नसे ऊर्मी ।
अप्राप्त पावयाची नसतांही वर्ततोंच मी कर्मीं ॥ ३-२२॥
जरि होऊनि निरालस कर्माच्या मी न चालतों वाटे ।
तरि सकळहि जन माझ्या मार्गें येती मला असें वाटे ॥ ३-२३॥
जरि न करीं कर्मा तरि हे होतील लोक उच्छिन्न ।
तेव्हां प्रजाविनाशक संकरकर्ताहि मी परिच्छिन्न ॥ ३-२४॥
अज्ञासक्त जसे कां असती कर्मांचिया महाहाटीं ।
ज्ञानी सक्त न तैसा परि जनशिल्शार्थ कर्म राहाटी ॥ ३-२५॥
जे अज्ञ कर्मसक्त प्रज्ञा त्यांची कदा न पर्तविजे ।
युक्तप्रज्ञें आपण कर्मांसि करोनि त्यांसि वर्तविजे ॥ ३-२६॥
प्रकृतिगुणानुग कर्में होती ऐसें असोनि हा मूढ ।
मी कर्ता म्हणवुनियां अभिमानीं व्यर्थ होत आरूढ ॥ ३-२७॥
गुणकर्मविभागीं तो तत्त्वज्ञान्यासि भेद साहीना ।
गुण संधींतचि वर्तति ऐसें जाणोनि सक्त होईना ॥ ३-२८॥
प्रकृतिगुणें मोहित जे गुणकर्मीं सक्त मंद अज्ञानी ।
त्यांचे मनास चालन न करावें जाणत्यांहि सुज्ञानीं ॥ ३-२९॥
अध्यात्मविचारें करि माझ्या ठायीं स्वकर्मसंन्यास ।
निर्मम निष्काम रणीं निश्चळ होवोनि मारि सैन्यास ॥ ३-३०॥
ईर्ष्या त्यागुनि पार्था ऐसे माझ्या मतीं न जे विटती ।
विश्वासी ते मानव कर्मापासोनि सर्वदा सुटती ॥ ३-३१॥
करुनी ईर्ष्या त्यजिती जे या माझ्या मतास कीं नाश ।
सर्व ज्ञानविमूढचि पावति ते जाण पातकी नाश ॥ ३-३२॥
ज्ञानीही वश केला प्रकृतीच्या तूं पहा उपाधीन ।
प्रकृतीला वश भूतें प्रकृतिस निग्रह करी ना आधीन ॥ ३-३३॥
ज्या त्याहि इंद्रियार्थीं राग आणि देवष हे रिपू थोर ।
त्यांला वश नच व्हावें हे दोघे मोक्षमार्गिंचे चोर ॥ ३-३४॥
उत्तम परधर्माहुनि विगुणहि निजधर्म पुण्य दे थोर ।
निजधर्मीं मरण बरें परधर्में नरक होय तो घोर ॥ ३-३५॥
पार्थ म्हणे कोण नरें योजियला करित पाप वद बापा ।
इच्छा नसतांचि बळें प्रेरियला कीं करी जसा पापा ॥ ३-३६॥
कृष्ण म्हणे पार्था हा रजोगुणोद्भवचि काम हा क्रोध ।
ग्रासक बहु पापी हा वैरी तूं जाण करुनियां शोध ॥ ३-३७॥
जैसा आदर्श मळें जरायुनें गर्भ वह्नि धूमानें ।
वेष्टित तैसें पार्था आवरिलें हें समग्र कामानें ॥ ३-३८॥
ज्ञात्याचा नित्य रिपू हा काम ज्ञान आवरी जाण ।

न म्हणे पुरे कधींही पूर्ण नव्हे हा कदा तुझी आण ॥ ३-३९ ॥
इंद्रिय-मन-बुद्धीशीं अधिष्ठुनीयां वसे सदा देहीं ।
ईहीकरूनि यातें आवरुनि ज्ञान मोहवी देही ॥ ३-४० ॥
यास्तव इंद्रियदमनें विज्ञानज्ञाननाशका आधीं ।
पापी रिपु कामाला मारुनियां मारिजे महा आधी ॥ ३-४१ ॥
इंद्रियगण हा परतो त्याहुनि मन त्याहुनी मती पर ती ।
तीहुनि आत्मा पर तो नाहीं उत्कृष्टता तयापरती ॥ ३-४२ ॥
एवं बुद्धिपरातें जाणुनि मतिनें मना महाबाहो ।
नियमुनि निजरिपु कामा मारीं जयवंत तूं महा बा हो ॥ ३-४३ ॥

पार्था सांगितला म्यां अव्यय हा जाण योग सूर्यास ।
सूर्यें मनुला कथिला मनुनें इक्ष्वाकु राजवर्यास ॥ ४-१ ॥
एवं परंपरागत राजर्षी योग जाणती श्रेष्ठ ।
महता काळेंकरुनी होता झाला परंतपा नष्ट ॥ ४-२ ॥
भक्तसखा तूं म्हणुनी पुरातन तुलाच योग हा कथिला ।
ऐकें भारतवर्या परम निजरहस्ययुक्तिनें ग्रथिला ॥ ४-३ ॥
जन्म पुरातन रविचा जन्म तुझा यादवा दिसे अपर ।
आधीं कथिलें त्वां हें कैसें जाणेन सांग याउपर ॥ ४-४ ॥
तूझीं माझीं गेलीं पार्थ जन्में बहूत संसारीं ।
तें तूं नेणसि बापा जाणें सर्वज्ञ मीच कंसारी ॥ ४-५ ॥
अज अव्यय भूतेश्वर निर्गुण जो मी उपाधिला त्यजितों ।
प्रकृतिसि अधिष्ठुनियां मायेनें आपणास मी सृजितों ॥ ४-६ ॥
ज्या ज्या समयीं धर्मग्लानी होते अधर्म उद्भवतो ।
त्या त्या समयीं वेगें भारतवर्या जगांत संभवतों ॥ ४-७ ॥
साधुत्राण कराया खळदुष्टांचें करावया हनन ।
धर्म स्थापायासी घेतों पार्था युअगायुगीं जनन ॥ ४-८ ॥
एवं पार्था माझें जाणें जो जन्मकर्म निश्चित रे ।
देहांतीं जन्म पुन्हा न पवे मजशीं मिळोनि तोचि तरे ॥ ४-९ ॥
रागभय क्रोधरहित मन्मय ते जन्मले नर सुपूत ।
ज्ञानतपें पावत बहु पावति मजला मदाश्रयें पूत ॥ ४-१० ॥
जे जैसें मज भजती तैसें भजतों तयांसि मी पाहा ।
माझ्यावर्त्मा सर्वहि अनुवर्ते मनुजसंघ बापा हा ॥ ४-११ ॥
कर्माची हे सिद्धी इच्छुनियां देवतायजन करिती ।
मानवलोकीं हो ती कर्माची सिद्धि जेहि लोकरिती ॥ ४-१२ ॥
गुणकर्मविभागें म्यां केले उत्पन्न वर्ण हे चार ।
त्यांचा कर्ताही मी जाण अकर्ता करूनि सुविचार ॥ ४-१३ ॥

कर्मा लिप्त नव्हें मी कर्मफळीं कामना न बा धांवे ।
ऐसें जो मज जाणे त्याला कर्मीं कदा न बाधावें ॥ ४-१४॥
ऐसें जाणुनि कर्में केलीं पूर्विल मुमुक्षुंच्या निकरें ।
प्राचीनांनीं केलीं कर्में म्हणवूनि तूं करीं निकरें ॥ ४-१५॥
कर्माकर्मविचारीं मोहित जे थोर थोर कविराय ।
तें कर्म तुला कथितों पार्था जें जाणतां अशुभ जाय ॥ ४-१६॥
कर्माकर्मविकर्में जाणावीं सद्विचार साधूनी ।
कर्माची गहन गती ऐसें कथिलें सदैव साधूंनीं ॥ ४-१७॥
कर्म अकर्मीं कर्मीं अकर्म पाहे तया कळे वर्म ।
तो बुद्धिवंत युक्तहि केलें त्याणें समस्तही कर्म ॥ ४-१८॥
कर्मारंभ जयाचे इच्छासंकल्पवर्ज जे प्राज्ञ ।
कर्म ज्ञानाग्नीनें जाळिति ते जाण पंडित प्राज्ञ ॥ ४-१९॥
कर्मफलातें त्यागी नित्य सुतृप्त स्वयेंचि अनुभवितो ।
कर्मीं प्रवृत्त असतां न करी कांहीं स्वसौख्य अनुभवि तो ॥ ४-२०॥
निष्काम तनुमनांशी अवरुनि निःसंगतेशि जो वरिता ।
केवळ तनुसंबंधीं कर्में करिनी न लिंपतो दुरिता ॥ ४-२१॥
तुष्ट यदृच्छालाभें द्वंद्वरहित जो विमत्सरी युक्त।
ज्याला सिद्धि असिद्धि सम तो कर्में करूनिही मुक्त ॥ ४-२२॥
जो निःसंग विमुक्त ज्ञानीं ज्याचें करीत मन निलया ।
यज्ञार्थ कर्म करितो त्याचीं कर्मेंहि पवती विलया ॥ ४-२३॥
अर्पण हवि हुत वन्ही सर्वहि हें ब्रह्मरूप जो मानी ।
ब्रह्मक्रिया समाधी करुनी ब्रह्मासि पावतो ज्ञानी ॥ ४-२४॥
कर्म सदैव मखातें करिती वदलों सुयुक्ति हो मीं ती ।
ब्रह्माग्नीइचे ठायीं ज्ञानी यज्ञेंकरूनि होमी ती ॥ ४-२५॥
संयमवन्हिंत कोणी करिती श्रोत्रादिहोमचि सदा हा ।
शब्दादिक विषयांच्या करिती करणाग्निनें कुणी दाहा ॥ ४-२६॥
प्राणेंद्रियकर्मांचा अवघा समुदाय होमितां जळतो ।
ज्ञानेंकरुनी कोणी पेटविती आत्मसंयमानळ तो ॥ ४-२७॥
स्वाध्यायमखा कोणी करिती ज्ञानाध्वरासि संन्यासी ।
योगद्रव्य तपोमय यज्ञातें दृढव्रताढ्य संन्यासी ॥ ४-२८॥
प्राणीं अपान होमे प्राण अपानीं कुणी स्वबोधानें ।
प्राणापानगतीतें रोधुनि असती समीररोधानें ॥ ४-२९॥
कोणी नियताहारें प्राणी प्राणांसि होमिती बापा ।
हे सर्व यज्ञवेत्ते क्षाळिति यज्ञेंकरूनियां पापा ॥ ४-३०॥
यज्ञावशिष्ट अमृत सेवुनि पावति सनातन ब्रह्म ।
यज्ञावांचुनि कैसे लोक तया पावतील जें ब्रह्म ॥ ४-३१॥

एवं बहुविध यज्ञ श्रुतिनें सांगीतले असे स्वमुखें ।
कर्मज अवघे ऐसे जाणुनि हो मुक्त तूं निजात्मसुखें ॥ ४-३२॥
द्रव्यमखाहुनि अधिक ज्ञानमखा जाणते भवा तरती ।
ज्ञानेंकरूनि कर्में अवघीं सांडुनि परंतपा परतीं ॥ ४-३३॥
तें तूं नमनें प्रश्नें गुरुसेवेनें धनंजया जाण ।
तत्त्वज्ञानी ज्ञाना उपदेशिति गुज सख्या तुझी आण ॥ ४-३४॥
ज्या ज्ञानेंचकरुनियां पावसि पार्था पुन्हा न मोह महा ।
जेणें समग्र भूतें स्वात्मा निरखिशि ममात्मपरसम हा ॥ ४-३५॥
मोठा पापी अससी जरि पापासी तुझ्या नसे पार ।
ज्ञानप्लव घेउनियां जासिल वृजिनाब्धिच्याच तूं पार ॥ ४-३६॥
जैसा समिद्ध अग्नी करितो भस्म क्षणामधें काष्ठां ।
कर्में भस्म करावीं ज्ञानाग्नीनें तशीं पराकाष्ठा ॥ ४-३७॥
नाहीं सम ज्या दुसरें पवित्र ज्ञानमध्यें नसे काळें ।
तें तूं स्वकर्मयोगें होउनि संसिद्धि पावसी काळें ॥ ४-३८॥
तत्पर विजितेंद्रिय तो ज्याच्या चित्तीं सदैव विश्वास ।
ज्ञानें शांतिस पावे वदतों मी कृष्ण तुजचि विश्वास ॥ ४-३९॥
जो अज्ञ अविश्वासी करि संशयवंत आपुला नाश ।
लोकद्वया नाहींही सुख नाहीं ज्यास संशय मनास ॥ ४-४०॥
योगें कर्में त्यागी ज्ञानें छेदीच संशया त्याला ।
जाणें धनंजया तूं कर्में बाधिति न आत्मवेत्त्याला ॥ ४-४१॥
यास्तव अज्ञानें जो हृदयीं उपजुनि करी महा तूट ।
ज्ञानासीनें छेदुनि संशय तो कर्मयोग करि ऊठ ॥ ४-४२॥

सांगसि कर्माचा तूं योगही संन्यासही मला आंगें ।
कृष्णा या दोंमध्यें श्रेयस्कर एक निश्चयें सांगें ॥ ५-१॥
संन्यास कर्मयोगहि दोन्ही कल्याणकर परंतु जनीं ।
कर्मत्यागाहुनि हा विचारितां कर्मयोग बहुत गुणीं ॥ ५-२॥
निर्द्वंद्व महाबाहो निरीह जो द्वेषिनाच अन्यासी ।
पावेना बंध कधीं जाणावा सत्य तोचि संन्यासी ॥ ५-३॥
सांख्याचें योगाचें मूर्खा भिन्नत्व पंडितां नाहीं ।
दोघांचें फळ देतो सम्यक् एकहि अनुष्ठितांनाही ॥ ५-४॥
सांख्यें पावे जैसें योगेंही स्थान लब्ध होय तसें ।
सांख्यातें योगातें पाहे जो एक तोचि पाहतसे ॥ ५-५॥
संन्यास महाबाहो योगावांचोनि फार दुष्कर तो ।
योगें युक्तचि मुनि तो ब्रह्मप्राप्तीसि शीघ्र तो करितो ॥ ५-६॥
विजितात्मा शुद्धात्मा योगीं रत जो जितेंद्रियग्राम ।

आत्मा सकळांचा तो कर्मे करुनी अलिप्त निष्काम ॥ ५-७॥
अशनीं वासग्रहणीं निद्रा श्रवणींहि दर्शनीं गमनीं ।
स्पर्शीं श्वासीं कर्ता मी हें तत्त्वज्ञ युक्त तो न मनी ॥ ५-८॥
निपुणहि निमिषोन्मेषीं दानग्रहणींहि भाषणप्रमुखीं ।
करणें करणार्थीं हीं वर्तति भावुनि सदा विदेहि सुखी ॥ ५-९॥
ब्रह्मीं अर्पुनि कर्मे करि जो होउनि अलिप्त संगमळीं ।
पापें लिप्त नसे तो कमळदळ जसें न लिप्त होय जळीं ॥ ५-१०॥
देह मन बुद्धि यांहीं योगी गतवासनेंद्रियांसहित ।
निजचित्तशुद्धिसाठीं संग त्यागूनियां क्रिया करित ॥ ५-११॥
त्यागुनि कर्मफळातें पावे तो मुक्त नैष्ठिकी शान्ती ।
कामें अयुक्त बंधा कर्मफळासक्त पावतो अंतीं ॥ ५-१२॥
करुनी कर्मेंहि मनें संन्यासी होउनी असे स्वसुखें ।
देहनवद्वारपुरीं कांहीं नकरी स्वयें न करवि सुखें ॥ ५-१३॥
कर्तृत्व कर्म यांतें लोकांचें निर्मितो न ईश्वर तें ।
तेविं न कर्मफळाच्या भोगा संस्कारचक्र हें वर्ते॥ ५-१४॥
कोणाचें अघ नेघे नेघे पुण्यासही विभु परंतू ।
अज्ञान ज्ञानातें अवरी तेणेंचि मोहती जंतू ॥ ५-१५॥
आत्मज्ञानें ज्याचें अज्ञान समूळ पावलें नाश ।
सूर्यापरि दावी तें ज्ञान प्रगटोनि आत्मरूपास ॥ ५-१६॥
तन्निष्ठ तत्परायण अर्पुनि मन बुद्धि ईश्वरीं सारी।
न पवति पुनरावृत्ति ज्ञानें नाशोनि कल्मषें भारी ॥ ५-१७॥
विद्याविनयी ब्राह्मण गाय गज श्वपच आणि तीं श्वानें ।
पाहति समदृष्टी जे पंडित ते वंदिजेत विश्वानें ॥ ५-१८॥
स्थिर मन समीं जयांचें जितांचि भव जिंकिला तिहीं पार्था ।
सम तें ब्रह्म सुनिर्मळ तस्माद् ब्रह्मींच ते समीं समता ॥ ५-१९॥
प्रिय होतां हर्षेना अप्रिय होतांचि दुःख जो साहे ।
स्थिरबुद्धि न जो मूढ ब्रह्मीं ब्रह्मज्ञ पांडवा राहे ॥ ५-२०॥
बाह्यस्पर्श त्यागी पावे अंतःसुखासि जो योगी ।
तो ब्रह्मयोगयुक्त ज्ञानी अक्षय्य पूर्ण सुख भोगी ॥ ५-२१॥
जे विषयभोग पार्था ते दुःखाचे प्रतिक्षणीं दाते ।
उत्पत्तिनाशवंत स्ववशें रमविति बुधासि न कदा ते ॥ ५-२२॥
निजमरणाहुनि पूर्वीं कामक्रोधादि वेग जो साहे ।
तो योगी तोचि सुखी तो ज्ञानी योग्य मुक्तिला लाहे ॥ ५-२३॥
अंतःप्रकाशमय जो अंतःसुखयुक्त अंतराराम ।
तो ब्रह्मयुक्त योगी पावे निर्वाण पांडवा ब्रह्म ॥ ५-२४॥
निर्वाणब्रह्मातें पावति ऋषिवर्य जाण निष्पापा ।

छिन्नद्वैत यतात्मे करणारे सर्व भूतहित बापा ॥ ५-२५ ॥
कामक्रोधत्यागीं जे यति वशचित्त साधुजनमैत्र ।
निर्वाणब्रह्म तयां विदितात्म्यांला असेचि सर्वत्र ॥ ५-२६ ॥
बाह्यस्पर्शत्यागें भ्रूमध्यामाजि दृष्टि रोधोनि ।
नासांतरसंचारी प्राणापानहि समान साधूनी ॥ ५-२७ ॥
इंद्रिय-मन-बुद्धीतें दमुनी धरि मुक्तिची मनीं चोप ।
तो मुनि मुक्त म्हणावा नाहीं ज्याला भय स्पृहा कोप ॥ ५-२८ ॥
भोक्ता यज्ञतपांचा लोकेश्वर मीच वेद-वेदांती ।
भूतांचा सुहृदहि मी मातें जाणुनि पावतो अंतीं ॥ ५-२९ ॥

कर्मफळाचा आश्रय न करुनि जो नर करीत निजधर्म ।
तो संन्यासी योगी नेणें अक्रिय अनग्नि तें वर्म ॥ ६-१ ॥
ज्या संन्यास म्हणावें पार्था त्यालाच योग तूं जाण ।
संकल्प-त्यागाविण कोणी योगी नव्हे तुझी आण ॥ ६-२ ॥
योगारुरुक्षु मुनि जो पार्था कारण तयासि तें कर्म ।
योगारूढ मुनीला कारण शम तोचि दे महाशर्म ॥ ६-३ ॥
जेव्हां कुंतीतनया टाकुनि संकल्पजाळ-भारूड ।
कर्मीं आणिक विषयीं उदास जो तोचि योग-आरूढ ॥ ६-४ ॥
उद्धरिजे अपअपणां करिजे अपुला न घात आहो तो ।
मित्रहि अपुला आपण पार्था अपुलाचि शत्रुही होतो ॥ ६-५ ॥
जिंकी मन जो त्याचें मानस तें आत्मबंधु हितकर तो ।
मानस अनात्मयाचें होतें अपुला रिपूहि तो करतो ॥ ६-६ ॥
जितमन शांतात्मा जो त्याचा आत्मा भवार्णवांत तरे ।
शीतोष्णीं सुखदुःखीं मानामानीं असे समाहित रे ॥ ६-७ ॥
जो कूटस्थ जितेंद्रिय विज्ञानज्ञानतृप्तिनें धाला ।
ढेंकुळ धोंडा सोनें ज्या सम तो युक्त मान्य विबुधांला ॥ ६-८ ॥
द्वेष्य उदासीन् रिपू बंधू मध्यस्थ सुहृद आणि मित्र ।
साधू पापी यांला पाहे सम तो विशिष्ट सर्वत्र ॥ ६-९ ॥
जो संयतचित्तात्मा पार्था निष्काम संचयत्यागी ।
एकांतीं एकाकीं ब्रह्मीं योजी मनास जो योगी ॥ ६-१० ॥
शुद्ध स्थानीं अपुलें स्थिर आसन घालुनी सुयोगरतें ।
अत्युच्च नीचहि न जें वस्त्राजिन दर्भ ज्यांत उत्तर तें ॥ ६-११ ॥
त्या आसनिं बैसोनी करुनी एकाग्र धीर-चित्त मुनीं ।
आत्मविशुद्धीसाठीं योजावा योग इंद्रियें दमुनी ॥ ६-१२ ॥
काय शिर-ग्रीवांतें सम अचळ तसें करूनि नासग्र ।
पाहुनि दिशा न पाहुनि करुनी ब्रह्मीं मनास एकाग्र ॥ ६-१३ ॥

मजवरि मन ज्याचें त्या शांतात्म्याचें समूळ भय परतो ।
सब्रह्मचर्य रत जो युक्त असो मन दमूनि तत्पर तो ॥ ६-१४ ॥
नियमुनि चित्त ब्रह्मीं योजी ऐसा सदैव जो योगी ।
मद्विषया जे परमा ते हे निर्वाणशांति तो भोगी ॥ ६-१५ ॥
केवळ उपवाश्याला योग नको आणि फार खात्याला ।
जागे फार निजेही कौंतेया योग पारखा त्याला ॥ ६-१६ ॥
आहार विहार नियत करितो कर्मींहि नेमिल्या चेष्टा ।
फार न जागे न निजे योग तया सौख्य दे कुरुश्रेष्ठा ॥ ६-१७ ॥
जेव्हां ब्रह्मींच वसे ज्याचें नियमित सदैव अंतर तो ।
निःस्पृह कामीं तेव्हां युक्त म्हणावा सुखा न अंतरतो ॥ ६-१८ ॥
जो आत्मयोग योजी जितमन ज्याचाहि कामरिपु मेला ।
तो सद्योगी पावे सुस्थिर निर्वातदीप-उपमेला ॥ ६-१९ ॥
जेथें उपरम पावे मन योगनिरुद्ध निज सुखें पुष्ट ।
जेथें आपण अपणां पाहुनि अपुल्याच ठायीं संतुष्ट ॥ ६-२० ॥
बुद्धिग्राह्य अतींद्रिय आत्यंतिक सौख्य जें तया जाणे ।
जेथे सुस्थिर होतां तत्त्वापासुन न होतसे जाणें ॥ ६-२१ ॥
ज्या लाभातें पावुनि लाभ न मानी दुजा अधिक मग तो ।
जेथें स्थिर मन करितां मोठ्या दुःखेंहि तो न डगमगतो ॥ ६-२२ ॥
दुःखाचा लेश नसे ज्यांतहि तो योग पांडवा जाण ।
सुविरक्तें योजावा निःसंशय हाचि योग निर्वाण ॥ ६-२३ ॥
संकल्पें जे उठती पार्था ते सर्व काम सांडावे ।
सर्वत्र इंद्रियांचा चित्तें गण दमुनि योग मांडावे ॥ ६-२४ ॥
धैर्यें वळवुनि मतिला हळूहळू उपरतीस जिंकावें ।
ब्रह्मीं स्थिर मन करुनी कांहीं मग पांडवा न चिंतावें ॥ ६-२५ ॥
चंचळ मन अस्थिर हें ज्या ज्या विषयाकडेचि बा धांवे ।
त्या त्यापासुनि आणुनि सुज्ञें हृदयीं हळूच बांधावें ॥ ६-२६ ॥
शांतात्मा निष्पाप ब्रह्मीं कांहीं असे न अंतर ज्या ।
उत्तम सुख वरितें त्या जो हा योगी अखंड शांतरजा ॥ ६-२७ ॥
एवं संतत योगी योजी निष्पाप जो मना यास ।
ब्रह्मस्पर्षसुखातें पावे अत्यंत तो अनायास ॥ ६-२८ ॥
आत्म्यामाजीं भूतें पाहे भूतांत आत्मयास महा ।
दृढयोगयुक्त आत्मा ज्याचा तो पाहणार जग सम हा ॥ ६-२९ ॥
पाहे सर्वत्र मला माझ्या ठायींहि सर्व लोकांस ।
माझा त्यासीं मजसीं त्याचा न विनाश एकएकास ॥ ६-३० ॥
सर्वां भूतीं मज जो एकत्वें भजत परम उद्योगी ।
आसोनी विश्वांतहि माझ्या ठायीं असेचि उद्योगी ॥ ६-३१ ॥

स्वानुभवें सुखदुःखीं ज्याची सर्वत्र दृष्टि सामान्य ।
परमश्रेष्ठ महात्मा पार्था योगी न तो कसा मान्य ॥ ६-३२॥
जो योग तुवां कथिला साम्यें जेणें घडे सदा स्वरती ।
परि त्या चंचलेस्तव त्याची न दिसे मला स्थिती स्थिर ती ॥ ६-३३॥
चंचल हे मन कृष्णा प्रमाथि दृढ सबळ विषयशुष्करसें ।
बंची त्याचें भासे धारण वायूसमान दुष्करसें ॥ ६-३४॥
चंचल धरवेना जें निःसंशय मन बहूत तापड ते ।
पार्था अभ्यासानें वैराग्यानें परंतु सांपडतें ॥ ६-३५॥
वाटे मम मतिला जो अजितात्मा यासि योग दुष्प्राप ।
वश्यात्मा यत्न करी पावाया शक्य त्यासि निष्पाप ॥ ६-३६॥
शिथिल श्रद्धा असतां ज्याचें योगांतुनीहि मन चळतें ।
पावुनि न योग सिद्धिस कोण गती त्यास हें न मज कळतें ॥ ६-३७॥
जो अप्रतिष्ठ कृष्णा ब्रह्मपथामाजिं मूढ न समाय ।
होउनि उभयभ्रष्ट च्छिन्नाभ्रापरि विरे न कीं काय ॥ ६-३८॥
या माझ्या संदेहा कृष्णा तूंची समर्थ वाराया ।
तुजवीण संशयाचा छेत्ता कोणी न यादवा राया ॥ ६-३९॥
इहलोकीं परलोकीं नाश तयाचा कधीं नसे बापा ।
सुकृताचारें कोणी दुर्गति न पवे तसाचि संतापा ॥ ६-४०॥
जो पुण्यवंत त्यांच्या लोकीं चिरकाळ भोगुनी इष्ट ।
शुद्धा श्रीमंतांच्या सदनीं घे जन्म योगविभ्रष्ट ॥ ६-४१॥
अथवा मतिमंतांच्या योग्यांच्या जन्म घे कुलोत्तंसीं ।
ऐसें अति दुर्लभ हें या लोकीं जन्म जाण सद्वंशीं ॥ ६-४२॥
तेथें जन्मांतरिचा पावे संयोग योगबुद्धीचा ।
योगी तो कौंतएया पुनरपि करितो प्रयत्न सिद्धीचा ॥ ६-४३॥
त्या पूर्वाभ्यासबळें परवश तो योग मागुता मांडी ।
जाणों इच्छी योगचि शब्दब्रह्मासि तोचि वोलांडी ॥ ६-४४॥
यत्नें योग करी तो होतां निष्पाप त्याउपर मग ती ।
बहु जन्में सिद्धाला योग्याला होय जाण परम गती ॥ ६-४५॥
अधिक तपस्व्याहुनिही योगी ज्ञान्यांहुनी महा बा हो ।
आणि अधिक कर्मीहुनि यास्तव हो योगि तूं महाबाहो ॥ ६-४७॥
सर्वां योग्यांमध्यें मातें मद्रतमनें हरोनि तम ।
श्रद्धावंत भजे जो तो मज अतिमान्य जाण युक्ततम ॥ ६-४७॥

माझी आसक्ति मनीं मदाश्रयें योग करुनि निर्वाण ।
निश्चित समग्र मातें जाणसि तें ऐक सांगतों जाण ॥ ७-१॥
विज्ञानज्ञान तुला कथितों साकल्य वदति जें शिष्ट ।
ज्यातें जाणोनि पुन्हा जाणायाचेंहि नुरविं अवशिष्ट ॥ ७-२॥

मनुजांच्याहि सहस्रीं विरळा करि यत्न सिद्धिचा सत्त्वें ।
यत्नहि कर्त्या सिद्धामाजीं विरळाचि जाणतो तत्त्वें ॥ ७-३॥
क्षिति जळ तेज समीरण आणिक आकाशही अविच्छिन्न ।
मन बुद्धि अहंकार प्रकृती अशी जाण अष्टधा भिन्न ॥ ७-४॥
जीवस्वरूप दुसरी प्रकृति परम जाण सांगतों तुज गा ।
तूं ऐक महाबाहो धरिती जे यास दास ते मज गा ॥ ७-५॥
प्रकृतीपासुनि भूतें सर्वहि होतात हाचि निर्धार ।
परि मी सकळ जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयांसि आधार ॥ ७-६॥
मजहुनि अन्य निराळें नाहीं दुसरें धनंजया कांहीं ।
माझे ठायीं ग्रथिलें सर्वहि सूत्रीं मण्यापरी पाहीं॥ ७-७॥
रविचंद्रांत द्युति मी सर्वा वेदांत मीच ओंकार ।
उदकीं रस शब्द नभीं पुरुषांतहि मीच पौरुषाकार ॥ ७-८॥
मी भूंत पुण्यगंधहि मी ज्वलित विभावसूंत तेज असें ।
तप मी तपस्वियांतहि जीवन भूतांत जाण मीच असे ॥ ७-९॥
बुद्धि सुबुद्धांतचि मी भूतांचें बीज जें सनातन मी ।
तेजहि तेजस्व्यांतचि मी हें जाणोनियां सनात नमीं ॥ ७-१०॥
बलही बलवंतांचें पार्था जें कामरागवर्जित मी ।
धर्माविरुद्ध कांहीं भूतीं मी जो नेत अंधतमीं ॥ ७-११॥
सात्त्विक राजस तामस मजपासुनियांच भव हे सारे ।
त्यांमाजीं मी न वसें मजमाजीं असति भाव हे सारे ॥ ७-१२॥
भाव तिन्ही हे पावत झालें जग हे इहींच मोहास ।
नेणें मातें पार्था त्रिगुणपरा सर्व काम देहास ॥ ७-१३॥
दैवी ही त्रिगुणमयी माझी माया जगांत दुस्तर ती ।
येती शरण मला जे त्यांची माया समूळ निस्तरती ॥ ७-१४॥
मायाभ्रष्ट ज्ञानहि मानसिं जे धरिति दैत्यभावातें ।
दुष्कृति मूढ नराधम पावति मज बळरामभावातें ॥ ७-१५॥
भजती भावें मातें नर कौंतेया चतुर्विध प्रकृती ।
अर्थार्थी जिज्ञासू आर्त ज्ञानी असे महा सुकृती ॥ ७-१६॥
त्यांत विशिष्ट ज्ञानी करितो जो एकभक्ति मुक्त्यर्थ ।
तो ज्ञानीही प्रिय मज त्या प्रिय मी नित्य युक्त इत्यर्थ ॥ ७-१७॥
सर्वहि उदार पार्था ज्ञानी आत्माचि माझिये मतिला ।
मान्य असे युक्तात्मा पावे आश्रित मलाच सद्गतिला ॥ ७-१८॥
बहु जन्मांचे अंतीं पावे तो ज्ञानवंत भवशमना ।
जग वासुदेवरूपी पावे तो दुर्लभ प्रशस्तमना ॥ ७-१९॥
त्या त्या कामें हरलें ज्ञान म्हणुनि अन्य देवता यजिती ।
त्या त्या नियमा धरुनी प्रकृतिस वश होउनी न त्या त्यजिती ॥ ७-२०॥

जो जो ज्या ज्या देवा इच्छी पूजावयासि भक्तीनें ।
तेथें त्याला देतों अचळश्रद्धेस कपटयुक्तीनें ॥ ७-२१॥
त्या श्रद्धेच करुनि तो त्यां इतरां देवतांसचि भजोन ।
म्यांच दिलें फळ घे त्या देवापासोनियांहि समजोन ॥ ७-२२॥
परि त्या अल्पमतीचें पार्था फळ नाशवंत तूं समज ।
देवार्चक देवातें पावति मद्भक्त पावताति मज ॥ ७-२३॥
अव्यक्तां मज आतां व्यक्तिच ऐसेंचि मानुनी भ्रमती ।
उत्तम माझा अव्यय नेणुनियां परम भाव ते कुमती ॥ ७-२४॥
मी न दिसे सर्वांला मायेने आसतों सदा गूढ ।
मज अव्यया मला ते म्हणवुनि पार्था न जाणती मूढ ॥ ७-२५॥
भूतें आणि भविष्यें जाणें मी वर्तमानही भूतें ।
परि त्यामाजीं कोणी जाणें मातें कदापि न विभूतें ॥ ७-२६॥
इच्छाद्वेषभवाच्या पडोनियां द्वंद्वमोहजाळातें ।
सर्वहि भूतें पार्था पावति मोहास सृष्टिकाळातें ॥ ७-२७॥
ज्यांचें पाप निमालें लोकीं जे फार पुण्यवंत जन ।
ते द्वंद्वमोहविरहित करिती माझें दृढव्रती भजन ॥ ७-२८॥
वाराया जन्मजरा योगी करिती प्रयत्न जे सकळे ।
माझा आश्रय करुनी अध्यात्म ब्रह्मकर्म त्यांस कळे ॥ ७-२९॥
मी साधिदेव पार्था साधिमखहि साधिभूत मीच असें ।
जाणति जे मज अंतीं जाणति मज नित्य युक्त तेचि असे ॥ ७-३०॥

पुरुषोत्तम कवणें तें अध्यात्म ब्रह्म आणि तें कर्म ।
अधिदैवहि अधिभूतहि वद त्याचें तें असेल बा वर्म ॥ ८-१॥
कोण कसा यादेहीं अधियज्ञ मनांत तेंहि बाणावें ।
कैसें प्रयाण समयीं गृहीतचित्तीं तुलाहि जाणावें ॥ ८-२॥
अक्षर परम ब्रह्म स्वभाव अध्यात्म वदति मुनिवर्ग ।
पंच महाभूतांचा विकार तें जाण कर्म तनुसर्ग ॥ ८-३॥
अधिभूत क्षरतनु हे अक्षर अधिदैव होय अधिकारी ।
अधियज्ञ मीच देहीं जीवांचा पाळणार उपकारी ॥ ८-४॥
जो मनुज अंतकाळीं स्मरोनि मातें त्यजी कलेवर तो ।
येथें संशय नाहीं माझ्या भावासि तो बळें वरतो ॥ ८-५॥
सोडी कलेवरातें ज्या ज्या भावासि पांडवा स्मरुनी ।
त्या त्या भावा पावे चित्तिं ते भावना सदा धरुनी ॥ ८-६॥
यास्तव सर्वां काळीं स्मर मज परि तूं करीं अधीं युद्ध ।
पावसि निश्चित मातें मजला मन बुद्धि अर्पुनी शुद्ध ॥ ८-७॥
अभ्यासयोगनिरतें अनन्य चित्तें सदैव चिंतोन ।
दिव्य परम पुरुषा त्या पावे विषयीं कदा न गुंतोन ॥ ८-८॥

तमसःपर रवितेजा अचिंत्य धाता कवी अणून अणूं ।
शास्ता पुराण मी मज चिंतुनि दे जो मना दुजें न अणूं ॥ ८-९ ॥
दिव्य परम पुरुषाला अचळमनें योगभक्ति साधूनी ।
पावे प्रयाणकाळीं भ्रूमध्यें प्राण तोचि रोधूनी ॥ ८-१० ॥
जे ब्रह्मचर्यलभ्यहि जेथें यति रिघति रागनिस्तारें ।
अक्षर वेदज्ञ म्हणति तें पद तुज सांगतों सविस्तारें ॥ ८-११ ॥
रोधुनि सर्व द्वारें हृदयामाजीं मनासही दमुनी ।
ब्रह्मांडीं प्राण अणुनि अधिष्ठुनी योगधारणेस मुनी ॥ ८-१२ ॥
जो प्रणवासहि जपतो मातें तैसाच नित्य जो स्मरतो ।
मग अर्चिरादिमार्गें जाउनि सहब्रह्म या गती लभतो ॥ ८-१३ ॥
मी अन्य नव्हें ऐशा चित्तें जो स्मरतसे सदा मातें ।
पार्था सुलभ तया मी योगीं जो नित्य योजिला त्यातें ॥ ८-१४ ॥
मातें पावुनि पुनरपि नश्वर जें जन्मदुःखबीज कृषी ।
पावति ते न महात्मे गेले जे परम सिद्धिलाहिं ऋषी ॥ ८-१५ ॥
ब्रह्मभुवनपर्यंत प्रकट सकळ हो करी पुनावर्ती ।
मातें पावुनि कोणी न पडे तो मृत्युदुस्तरावर्तीं ॥ ८-१६ ॥
सहस्रयुअगपर्यंत ब्रह्मयाचा दिवस बोलती त्याला ।
तो युगसहस्ररात्री विदित अहोरात्र काळवेत्त्याला ॥ ८-१७ ॥
होती दिवसारांभीं अव्यक्तांतूनि सर्वही व्यक्ती ।
रात्रीच्या आरंभीं त्या होती लीन त्याचि अव्यक्ती ॥ ८-१८ ॥
भूतांचा संघहि हा होउनि होउनिही सदा हो तो ।
रात्रींत लीन होतो दिवसां उत्पन्न परवशें होतो ॥ ८-१९ ॥
अव्यक्तव्यक्ताहुनि भाव असे पर सनातन दुजा तो ।
भूतांच्या नाशींही न कधींही पांडवा लया जातो ॥ ८-२० ॥
अव्यक्त अक्षरहि जो परमा गति म्हणति त्यासि अनघा रे ।
तें माझें धाम परम ज्यातें पावुनि न येति माघारे ॥ ८-२१ ॥
तो परम पुरुष सखया सुलभ असे जो अनन्य भक्तीनें ।
भूतें ज्यांत जयानें हे सर्व व्याप्त जाण युक्तीने ॥ ८-२२ ॥
पडतां तनु ज्या काळीं जे पुनरावृत्ति अपुनरावृत्ती ।
पावति योगी कथितों त्या काळा एक दे मनोवृत्ती ॥ ८-२३ ॥
षण्मास उत्तरायण अग्नि दिन ज्योति शुक्लपक्ष असे ।
तेथें प्रयाणकर्ते ब्रह्म ब्रह्मज्ञ पावताति असे ॥ ८-२४ ॥
षण्मास दक्षिणायन धूम निशा कृष्णपक्ष संयोगी ।
तेथेंचि फिरे कर्मठ चांद्रमसज्योति पावुनी योगी ॥ ८-२५ ॥
ज्या शुक्लकृष्णगति त्या विश्वाच्या मान्य जाण शाश्वत रे ।
एकीनें जन्मा ये दुसरीनें मुक्त होउनीच तरे ॥ ८-२६ ॥

या दोहीं मार्गातें जाणुनि योगी न वश्य मोहास ।
यास्तव सर्वां काळीं करि तूं योगास काम-दोहास ॥ ८-२७ ॥
तप-यज्ञ-वेद-दानीं जें हें फळपुण्य त्यासि आक्रमुनी ।
हें जाणुनियां पावे आद्य परमपद सुयुक्त तोचि मुनी ॥ ८-२८ ॥

विज्ञानज्ञानसहित कथितों तुज गुह्य ऐकुनी बा धा ।
ईर्ष्याविरहित ज्यातें जाणुनि न पवसि कदा अशुभबाधा ॥ ९-१ ॥
उत्तम साक्षात्कारी धर्म्यहि अणि पूत राजविद्येचें ।
जें राजगुह्य उत्तम शक्य कराया रिपू अविद्येचें ॥ ९-२ ॥
पुरुष श्रद्धाविरहित न भजति जे धर्ममार्ग कंसारी ।
जो मी या मज न पवुनि फिरती ते मृत्युवर्त्म संसारीं ॥ ९-३ ॥
अव्यक्तमूर्तिनें म्यां व्यापियलें नित्य जाण सर्व जगा ।
भूतें माझ्या ठायीं भूतांमाजीं न तूं पहा मज गा ॥ ९-४ ॥
मजमाजिं न भूतें हीं माझा ऐश्वर्ययोग बा पाहा ।
भूतकर भूतभावन माझा आत्मा जगीं न बापा हा ॥ ९-५ ॥
जैसा सर्वग वायू गगनाधारें असे जगत्प्राण ।
तैसें माझे ठायीं सर्वहि भूतें असें बरें जाण ॥ ९-६ ॥
कल्पारंभीं भूतें करितों निर्माण मीच निष्पापा ।
कल्पक्षयीं पुन्हा तीं येती प्रकृतींत माझिया बापा ॥ ९-७ ॥
बा कुरुकुळवतंसा आधीं प्रकृतीस आपुल्या वरितों ।
परवश भूतसमूह प्रकृतिवशें मग पुनःपुन्हा करितों ॥ ९-८ ॥
परि तीं कर्में मातें बांधुनि नेती कदा न अंधतमीं ।
त्या कर्मींही असतों औदासीन्यें असक्त संतत मी ॥ ९-९ ॥
मी अध्यक्ष म्हणोनी प्रकृतीही निर्मितों चराचर ती ।
या हेतूनें विश्वें संसारामाजिं नित्य संचरती ॥ १० ॥
जो मी भूतमहेश्वर त्या माझा भाव परम जो गूढ ।
नेणुनि मनुष्य मातें मानुनि अवमानिती मूढ ॥ ९-११ ॥
आशा कर्म ज्ञानहि वृथा जयांचें सकाम मंदमती ।
जैं दैत्यराक्षसांची मोहकरी प्रकृति होउनी भ्रमती ॥ ९-१२ ॥
एकाग्रमन महात्मे त्या दैवी प्रकृतिचे अधिष्ठाते ।
अव्यय मी भूतादिहि मज जाणुनि भजति धरुनि निष्ठा ते ॥ ९-१३ ॥
संतत कीर्तित मातें दृढवती यत्नशीळ अनुरक्त ।
नमुनीं मज भक्तीनें उपासिती नित्ययुक्त मद्भक्त ॥ ९-१४ ॥
कोणी उपासिती ते ज्ञानमखानें सदा मला तजुनी ।
एकत्वें पृथकत्वें बहुधा मज विश्वतोमुखा भजुनी ॥ ९-१५ ॥
कीं विश्वमुखी म्हणवुनि यज्ञ क्रतु अग्नि होमिती तूप ।

मी औषध स्वधा मी पार्था मी सर्व मंत्र गुणरूप ॥ ९-१६ ॥
विश्वाचा मी धाता पिता पितामहहि मीच साकार ।
माता वेद्य पवित्रहि ऋक्-साम-यजुःश्रुतीहि ओंकार ॥ ९-१७ ॥
गति मी जगपाळक मी साक्षी आश्रय निवास मी स्वामी ।
उत्पत्ति स्थिति पालन निधान मी मित्र बीज विश्वा नी ,, ९-१८ ॥
रविरूपें तपतों मी रस आकर्षोनि वृष्टि वोपितसे ।
अमृतहि मीइ मृत्युहि मी धरितों मी स्थूल-सूक्ष्मरूप तसें ॥ ९-१९ ॥
वैदिक सोमप अनघ स्वर्गति इच्छिति यजोनि यागातें ।
इंद्र-भुवनिं त्या पुण्यें भोगिति ते दिव्य देव-भोगांतें ॥ ९-२० ॥
स्वर्गा बहु दिन भोगुनि येती पुण्यक्षयीं क्षितीला ते ।
एवं श्रुति-धर्मानें सकाम पावति गतागत-फळातें ॥ ९-२१ ॥
चिंतुनि अनन्य मातें सेविति जन नित्य युक्त ते जाण ।
योगक्षेम तयांचा पार्था मी वाहतों तुझी आण ॥ ९-२२ ॥
श्रद्धेनें अन्य यजुनि करिती ते अन्यदेवता-यजन ।
तेही मलाच भजती नेणुनियां विधिस मात्र मूर्ख जन ॥ ९-२३ ॥
मी सर्वां यज्ञांचा भोक्ता प्रभु मज न जाणुनी तत्त्वें ।
म्हणुनीयां च्यवती ते कैसे भजतील ते मला सत्त्वें ॥ ९-२४ ॥
देवव्रती सुरांतें पितृव्रती पावताति पितरांतें ।
भूतार्चक भूतांतें पावति मद्भक्त मज न इतरांतें ॥ ९-२५ ॥
फल-फूल-दल-जलेंही जो मातें करुनि भक्ति अर्पितसे ।
भक्तीनें आणियलें तें मी अमृतचि म्हणोनि वर्पितसें ॥ ९-२६ ॥
जें करिशी जें खाशी जें होमिशि तपिशि आणि जें देशी ।
तें मज करि अर्पण तूं हा मी श्रीकृष्ण तुजचि उपदेशीं ॥ ९-२७ ॥
तेणें त्यजिसी पार्था शुभाशुभ-फलाख्य कर्म-बंध मला ।
संन्यास योग-युक्तहि पावसि होऊनि मुक्त तूं अमला ॥ ९-२८ ॥
मी सम सर्वां भूतीं न प्रिय न द्वेष्यही मज रमा जी ।
मज भजती जे प्रेमें मी त्यामाजींहि तेहि मजमाजीं ॥ ९-२९ ॥
असुनि दुराचारीहि मजला होउनि अनन्य जो भजतो ।
साधुचि तो मानावा निश्चय त्याचा बरा गमे मज तो ॥ ९-३० ॥
सत्वर होतो सुकृती पावे स्थिर शांति नमिति ज्या ज्ञाते ।
मद्भक्तां नाश नसे करि कौंतेया अशा प्रतिज्ञातें ॥ ९-३१ ॥
माझा आश्रय करुनी जे कोणी पापयोनिच्या देहीं ।
स्त्री वैश्य शूद्र तैसे जाती गति पर न पडुनि संदेहीं ॥ ९-३२ ॥
मग तो भक्त ब्राह्मण राजर्शी पुण्य पावतील निका ।
मज तूं भज हा पावुनि नश्वर नर-लोक थोर दुःखनिका ॥ ९-३३ ॥
मद्रूपीं मन ठेवीं मद्भक्ति करीं मला नमीं यज रे ।

पुनरपिहि महाबाहो कथितों मी परमवचन बा परिस ।
तुज मी हितगुज वदतों तूं परम प्रिय मलाहि बा परिस ॥ १०-१ ॥
सुरगण आणि महर्षी नेणति माझा कुणीच संभवतो ।
आदी चराचरा मी मजपासुनि होय सर्व संभव तो ॥ १०-२ ॥
जो मी लोकमहेश्वर अनादि जो मी असें मज समजला ।
तो निष्पापशिरोमणि तोचि असंमूढ जाणता मजला ॥ १०-३ ॥
ज्ञान असंमोह सख्या शम दम पार्था तशीच जाण मती ।
सुख दुःख भयाभयही अभाव सत्य क्षमाहि उत्तम ती ॥ १०-४ ॥
संतोष दान समता यश अपयश तप तशी अहिंसा रे ।
भूतांचे बहुविध हे मजपासुनि होति भाव हे सारे ॥ १०-५ ॥
सप्तर्षि चार पूर्वज मनु हे मानस समग्र मद्भाव ।
झाले लोकीं त्यांच्या प्रजाहि ज्यांचा महानही भाव ॥ १०-६ ॥
माझे विभूतिलाही जाणे योगासि तत्त्वतां योगी ।
किमपिहि संदेह नसे अति दृढ योगासि होय संयोगी ॥ १०-७ ॥
उद्धव मी सर्वांचा प्रवर्ततें मजहिपासुनी सारें ।
हें जाणुनि मज भजती बुध ते होती न लिप्त संसारें ॥ १०-८ ॥
वर्णिति संतत मातें परस्परें बोधिती सुधीरमती ।
मजवरि चित्त प्राणहि ठेविति संतोषती सुधी रमती ॥ १०-९ ॥
ते नित्ययुक्त मातें प्रीतीनें भजति त्यां सकामांतें ।
तो बुद्धियोग देतों पावति जेणें धनंजया मातें ॥ १०-१० ॥
मी हृदयस्थ तयांच्या करुणेनें ज्ञानदीप लावोनी ।
देतों आत्मसुखातें अज्ञानातें लयासि नेवोनी ॥ १०-११ ॥
तूंचि परब्रह्म विभू पुरुष परंधाम दिव्य शाश्वत तूं ।
अज आदी अव्यय तूं परम पवित्रहि जगत्पटीं तंतू ॥ १०-१२ ॥
यापरि सांगसि तूंही वदति सकळ ऋषिहि तूज दिव्यास ।
देवऋषी नारद तो असितहि तसा मुनी व्यास ॥ १०-१३ ॥
जें वदसि केशवा मज तें मी अवघेंहि मानितों साच ।
व्यक्ती सुरासुर तुझी नेणति भगवंत अससि ऐसाच ॥ १०-१४ ॥
आपणचि आपणा तूं जाणसि बापा स्वयें सुराधीशा ।
भूतोद्भवकर देवा भूतेशा देवदेव जगदीशा ॥ १०-१५ ॥
दिव्य विभूती अपुल्या सांगाव्या मजहि त्या विभूतींनीं ।
यदुकुअळचकोरचंद्रा व्यापिसि हे लोक तूं विभूतींनीं ॥ १०-१६ ॥
चिंतुनि तुजला कैसें जाणावें म्यां मनांत यदुवंशा ।
कोण्या कोण्या भावीं चिंतूं कैशा तुझ्या विशिष्टांशा ॥ १०-१७ ॥
अपुली पुन्हा सविस्तर विभूति अणि योग सांग बहुधा तो ।

तुझिया वचन-सुधेच्या श्रवणें माझाहि जीव बहू धातो ॥ १०-१८ ॥
त्या मुख्य अपुल्याही दिव्य विभूती दया अकूपार ।
मी संक्षेपें कथितों विस्तारा माझिया नसे पार ॥ १०-१९ ॥
सकळां भूतांच्या मी हृदयी आत्मा असें गुडाकेशा ।
मी आदि-मध्य-अंतहि भूतांचा जाण मज हृषीकेशा ॥ १०-२० ॥
अदितिसुतीं मी विष्णू पार्था ज्योतिर्गणांत मीच रवी ।
मरुतांमाजिं मरीची भगणांमाजीं शशी तनू बरवी ॥ १०-२१ ॥
इंद्रियांमाजीं मन मी पार्था वेदांत जाण सामातें ।
भूतांत चेतना मी सुरांत मी इंद्र जाण या मातें ॥ १०-२२ ॥
पावक वसूंमधें मी राक्षस यक्षांत मीच वैश्रवण ।
मी पर्वतांत मेरूशंकर रुद्रांत मी करीं श्रवण ॥ १०-२३ ॥
मीच उपाध्यायांतहि बृहस्पती मुख्य ज्यास इंद्र नमी ।
सागर सरोवरीं मी सेनापाळांत तो षडानन मी ॥ १०-२४ ॥
प्रणवाक्षर वाणिंत मी जाण भृगू मी महर्षिसुज्ञांत ।
मी स्थावरीं हिमालय मी जपयज्ञ प्रशस्त यज्ञांत ॥ १०-२५ ॥
वृक्षीं अश्वत्थहि मी देवर्षींमाजिं जाण नारद मी ।
गंधर्वि चित्ररथ मी सिद्ध कपिल रत सदा शमदमीं मी ॥ १०-२६ ॥
ऐरावत द्वीपांतहि जाण नरांमाजिं तो नराधिप मी ।
उच्चैःश्रव अश्वांतहि जाण रसांमाजिं तेंच अमृत मी ॥ १०-२७ ॥
मी आयुधांत वज्रहि मी संतानांत योगि कंदर्प ।
धेनूंत कामधेनु मी सर्पांमाजिं वासुकी सर्प ॥ १०-२८ ॥
पितरांत अर्यमा मी शिक्षाकर्त्यांत जाण मीच यम ।
मी जलचरांत वरुणहि अनंत नागांत मीच हा नेम ॥ १०-२९ ॥
पक्ष्यांमाजिं गरुड मी असुरीं प्रह्लाद मी सगुण बाळ ।
मी केसरी मृगांतहि आकळणारांत मी असें काळ ॥ १०-३० ॥
मी धांवत्यांत पवनहि मत्स्यांमाजीं असें महामकर ।
सरितांत जाह्नवी मी शस्त्रधरांमाजिं रम सौख्यकर ॥ १०-३१ ॥
वादांत तत्त्ववादहि परि मी आद्यंतमध्य सृष्टींत ।
विद्येंत आत्मविद्या बरवें हें जाण आत्मसृष्टींत ॥ १०-३२ ॥
मी अक्षरीं अकार द्वंद्व समासांत हे विदित सुज्ञां ।
मी अक्षय काळ असें धाता मी सर्व सन्मुख प्रज्ञा ॥ १०-३३ ॥
मी मृत्यु सर्वहर्ता जन्मति जे यांत जन्म मी पाहें ।
नारींत स्मृति धृति मति वाणी कीर्ति क्षमा दया पाहे ॥ १०-३४ ॥
सामांत बृहत्सामहि गाउअत्री मीच अवघियां छंदी ।
मासांत मार्गशीर्षहि कौंतेया मी वसंत ऋतुवृंदी ॥ १०-३५ ॥
तेजस्वियांत तेजहि द्यूतचि मी जाण कपटकर्त्यांत ।

जय मी आणिक निश्चय मी सत्त्वहि सत्त्ववंत जे त्यांत ॥ १०-३६ ॥
वृष्णींत वासुदेवहि कौंतेया मी मुनींमधें व्यास ।
मी पांडवांत अर्जुन कविंमाजी कविस जाण शुक्रास ॥ १०-३७ ॥
मी नीति जगीं त्यांतहि दंडहि कर्त्यांत जाण मी दंड ।
गुह्यांत मौन मी हें ज्ञान्याचें ज्ञान जाण ऊदंड ॥ १०-३८ ॥
जें सर्वां भूतांचें बीज असे तेंहि अर्जुना हें मी ।
मजविण भूत चराचर न एकही जेविं होय नग हेमीं ॥ १०-३९ ॥
नाहीं कदापि माझ्या दिव्यविभूतींस अंत निष्पापा ।
उद्देशें कथिला तुज म्यां हा विस्तर विभूतिंचा बापा ॥ १०-४० ॥
जो जो प्राणी श्रीनें विभूतिनें युक्त ऊर्जितें गमतो ।
तो तो माझ्या अंशें संभवला जाण जो सुखें रमतो ॥ १०-४१ ॥
अथवा बहुतां ज्ञानें काय तुला अर्जुना सुधीरा हें ।
जग सकळहि मी बापा एक्या अंशेंचि व्यापुनी राहें ॥ १०-४२ ॥

अध्यात्म गुह्य उत्तम जें वचन अनुग्रहार्थ मज कथिलें ।
तेणें मोह निमाला ज्ञानामृत हें स्वयेंचि त्वां मथिलें ॥ ११-१ ॥
उद्भवलय भूतांचे अव्यय-माहात्म्यही सुराध्यक्षा ।
हे दोन्ही ऐकियले तुजपासुनि विस्तरेंच कमळाक्षा ॥ ११-२ ॥
यापरि बोलसि जैसें इच्छितसें पाहयासि रूप तसें ।
पाहों इच्छितसें मी तूझें दृश्य स्वरूप अद्भुतसें ॥ ११-३ ॥
योग्य असें कीं तुज मी पहावयाला मनांत भावावें ।
मग योगेशा मजला अव्यय ईशस्वरूप दावावें ॥ ११-४ ॥
माझीं रूपें पाहा कौंतेया तूं सहस्रशा शतशा ।
नाना वर्ण जयांतहि प्रकार नानाहि आकृतीहि तशा ॥ ११-५ ॥
माझे रूपीं पाहा तूं वसु रुद्रां मरुद्गणां सत्य ।
पूर्वी न देखिलीं जीं आश्चर्यें भारता महासत्य ॥ ११-६ ॥
माझ्या एकावयवीं जग सारें तूं पहा चराचर तें ।
आणिक पाहों इच्छिसि जें तूं तेंही इथेंचि संचरतें ॥ ११-७ ॥
पार्था या दृष्टीनें मला पहाया समर्थ तूं नाहीं ।
देतों तुजला चक्षू दिव्य तयानेंचि रूप हें पाहीं ॥ ११-८ ॥
श्रीपति योगेश्वर तो बोलुनि ऐसें पृथातनूजाला ।
अपुलें ईश्वररूप प्रेमें मग त्यासि दाविता झाला ॥ ११-९ ॥
नाना ज्यांत मुख नयन बहु अद्भुत दर्शनेंहि जें युक्त ।
नाना दिव्याभरणें नाना दिव्यायुधेंहि उद्युक्त ॥ ११-१० ॥
धरि दिव्यलेप द्योतक जें धरिती दिव्य ज्यांत पुष्पवट ।
जें सर्वाश्चर्यमयहि जें विश्वोन्मुख अनंत निष्कपट ॥ ११-११ ॥

जेव्हां गगनामाजीं एकसरें उगवती सहस्र रवी ।
तेव्हां महात्मयाच्या कांतीची सरि न कांति ते मिरवी ॥ ११-१२ ॥
त्या देवाच्या देहीं एकावयवीं अनेकधा भिन्न ।
पाहे पांडव तेव्हां हें सारें विश्वही परिच्छिन्न ॥ ११-१३ ॥
मग तो विस्मित झाला उठले रोमांच त्यास नेरदेवा ।
करुनी साष्टांग नमन बोले जोडोनि हस्त नर देवा ॥ ११-१४ ॥
तुझिया देहीं पाहें सुरभूतविशेष सर्व संघ जग ।
कमलासनस्थ विधि हर देव ऋषी दिव्य सर्व ते भुजग ॥ ११-१५ ॥
बहु कर उदर नयन मुख अनंतरूपा चहूंकडे दिससी ।
आद्यंत मध्य न तुला विश्वशा विश्वरूप तूं अससी ॥ ११-१६ ॥
चक्र-किरीट-गदा-धर दिससी सर्वत्र चहुंकडे दीप्त ।
सप्रभ अशक्य आम्हां अचिंत्य दीप्तार्क वह्निसम आप्त ॥ ११-१७ ॥
अक्षर तूं वेद्य परम अव्यय आश्रय जगा न सामान्य ।
शाश्वत धर्मे त्राता जुनाट पूरुष मला असा मान्य ॥ ११-१८ ॥
दीप्ताग्नि मुखहि बहुकर रवि-शशि नयन बहुवीर्य या तूतें ।
आद्यंत मध्यही ना पाहें मी स्वप्रकाशहेतूतें ॥ ११-१९ ॥
भूस्वर्गांचें अंतर दिशाहि एक्याचि पाहूनि तुझें त्रिलोक संतप्त ॥ ११-२० ॥
येती सुर शरण तुला कोणी कर जोडुनी भयें गाती ।
स्वस्थ असे वंदुनि मुनि सिद्धहि करिती स्तुती तसे गा ती ॥ ११-२१ ॥
वसुरुद्रादित्यमरुत् विश्वेदेवोष्मपाश्विनीकुमर ।
गंधर्व यक्ष साध्यहि विस्मित पाहाति सिद्धवर अमर ॥ ११-२२ ॥
त्यामाजीं बहु दाढा मांड्या मुख उदर नयन पद कर ते ।
विक्राळ घोर तूझें रूप जगासह मला व्यथा करतें ॥ ११-२३ ॥
बहुवर्ण नभःस्पर्शी विस्तृत मुख दीप्त विपुल नेत्रांस ।
तेज सख्या तुज पाहुनि गेलें मम धैर्य पावलें त्रास ॥ ११-२४ ॥
दंष्ट्रा कराल वदनें तूझीं काळाग्नितुल्य देवेशा ।
पाहुनि दिशाहि भुललों सुखहि न मज हो प्रसन्न जगदीशा ॥ ११-२५ ॥
हे धार्त्रराष्ट्र सारे आणिकही भूमिपाळ तत्पक्षी ।
भीष्म द्रोणहि कर्णहि तैसे जे वीर आमुच्या पक्षीं ॥ ११-२६ ॥
दंष्ट्रा कराल भ्यासुर जीं वदनें रिघति त्यांत संपूर्ण ।
दांतांत लागले जे कोणी त्यांचीं शिरें दिसति चूर्ण ॥ ११-२७ ॥
सागरसन्मुख जाती वेग नद्यांचे जसेहि नीरांचे ।
तेविं तुझ्या दीप्तमुखीं समूह निघती नृलोक वीरांचे ॥ ११-२८ ॥
जैसे दीप्ताग्निमधें वेगेंचि पतंग पडुनि मरताती ।
तैसे वदनीं तुझिया मरावया लोक शीघ्र शिरताती ॥ ११-२९ ॥
सर्वत्र दीप्त वदनें लोकांचा करिसि भक्षुनी ग्रास ।

कांती अत्युग्र तुझ्या तापविती या जनां समग्रास॥ ११-३०॥
तूं कोण उग्ररूपी वद तुज नमितों प्रसन्न हो आद्या ।
तुज जाणों इच्छितसें प्रवृत्ति नेणें तुझी स्वसंवेद्या ॥११-३१॥
मी लोक संहराया झालों काळ प्रवृद्ध ऐसा रे ।
योद्धे रणीं उभे जे तुजवांचुनि उतरतील हे सारे ॥ ११-३२॥
यास्तव उठ तूं यश घे म्य्यं तों वधिले अधींच सर्व अजीं ।
करि युद्ध राज्य अपुलें जिंकीं तूं हो निमित्तमात्र अजी ॥ ११-३३॥
भीष्म द्रोण जयद्रथ कर्ण तसे अन्य वीरहि प्रथित ।
म्यां वधिल्यांस वधीं तूं जिंकिसि रिपु युद्ध कर न हो व्यथित ॥ ११-३४॥
का म्पे भ्याल्याहुनि मी कर जोडुनि कृष्णवचन पांडव तें ।
ऐकुनि पुनरपि सद्गद बोले घडिघडि करोनि दंडवतें ॥ ११-३५॥
जग सर्व हृषीकेशा यशें तुझ्या हृष्ट आणि अनुरक्त ।
राक्षस पळति भयानें नमिती तुज सिद्धसंघ हे युक्त ॥ ११-३६॥
तुज जन न कां नमिति ते ब्रह्मयाला थोर आद्य तूं कर्ता ।
अव्यक्ताहुनि पर तूं अक्षर तूंही अनंत तूं भर्ता ॥ ११-३७॥
पुरुष परंधाम परम विश्वमया आदिदेव तमभेत्ता ।
विश्व व्याप्त तुवां हें पुरातनानंत वेद्य तूं वेत्ता ॥ ११-३८॥
प्रपितामह प्रजापति तूं शशि वरुणाग्नि वायु तो शमन ।
नमितों सहस्रदां मी मागुति करितों पुनः पुन्हा नमन ॥ ११-३९॥
सर्वत्र तूज सर्वां नमितों देवा पुढेहिं अणि मागें ।
अतिविक्रम तूं व्यापिसि तुज नमिति सर्व लोक या मागें ॥ ११-४०॥
स्नेहें अणि प्रमादें नेणुनि महिमा सखा म्हणुनि सदयां ।
वदलों हेंचि तुला मी हे कृष्णा हे यदूत्तमा सखया ॥ ११-४१॥
हास्यें करिता झालों सुखशयन क्रीडनाशनासन मी ।
एकांतीं लोकांतीं करीं क्षमा मी क्षमापनार्थ नमीं ॥ ११-४२॥
स्थिरचर लोकांचा तूं बाप गुरु श्रेष्ठ आणि पूज्य महा ।
न तुज समान अधिक कुणि त्रिजगीं तूझा प्रभाव अनुपम हा ॥ ११-४३॥
यास्तव साष्टांग नमीं प्रसन्न हो मज करीं क्षमा ऐशी ।
जैसी करि बाप सुता मित्र सख्या कीं प्रिय प्रिया तैसी ॥ ११-४४॥
पूर्वीं न देखियेलें उठले रोमांच यास पाहूनी ।
भयभीतमना मज तें दावीं रूप प्रसन्न होऊनी ॥ ११-४५॥
चक्र किरीट गदा तें धरि पहिलें रूप तूं चतुर्बाहो ।
अमितकरा विश्वतनू त्या रूपें इच्छितों तुला पाहों ॥ ११-४६॥
म्यां रूप आत्मयोगें तोषुनि तुज परम दाविलें तें जें ।
तुजविण अन्य न पाहे विश्व अनंताद्य युक्त जें तेजें ॥ ११-४७॥
नरलोकीं उग्रतपें दानमखें कर्म-वेद-अध्ययनें ।

त्या रूपें मी तुजविण शक्य पहाया न अन्य या नयनें ॥ ११-४८ ॥
घोर स्वरूप पाहुनि न हो व्यथा मूढभाव बापा हा ।
निर्भय संतुष्ट मनें माझें पूर्वस्वरूप बा पाहा ॥ ११-४९ ॥
बोलुनि ऐसें पुनरपि दावी निज रूप तो तया श्वासीं ।
होउनि सौम्य श्रीहरि भ्याल जो पार्थ त्यासि आश्वासी ॥ ११-५० ॥
हें मानुषरूप तुझें पाहुनि सौम्य प्रसन्नचित्त असें ।
स्वस्थ प्रकृतिहि झाली वाटे मी जन्मलो म्हि आजि असें ॥ ११-५१ ॥
जें देखिलें तुवां रे अशक्य जें रूप तें पहायास ।
पाहों इच्छिति सुरही माझ्या रूपास ते महायास ॥ ११-५२ ॥
या परिचा मी दानें यज्ञें वेदें तपेंहि सायासें ।
शक्य पहायास नसें जैसें त्वां देखिलें अनायासें ॥ ११-५३ ॥
ऐसा मी परि एका भक्तीनें लभ्यही प्रवेशाया ।
जाणावया पहाया तत्त्वें मी सुलभ समज ऐशा या ॥ ११-५४ ॥
मी तों परम जयाला मम अर्चक आणि नित्य मद्भक्त ।
निर्वैर सर्व भूतीं पावे मातें असंग तो युक्त ॥ ११-५५ ॥

संतत युक्त असे जे उपासिती भक्त तुज तुझ्याचि मतें ।
अक्षर अव्यक्त भजति त्यांतहि ते कोण योगवित्तम ते ॥ १२-१ ॥
ठेवुनि मजवरि मन जे परम श्रद्धा धरोनि हे अन्य ।
मातें उपासिती जे ते मजला युक्ततम महामान्य ॥ १२-२ ॥
अव्यक्त ध्रुव अक्षर सर्वग ज्या निर्गुणांत मन नचळ ।
कूटस्थ अनिर्देश्यहि उपासिती जे अचिंत्य अणि अचळ ॥ १२-३ ॥
सर्वत्र तुल्यदृष्टी इंद्रियगतिचें करोनियां दमन ।
सर्व प्राणिहितीं जे तत्पर पावति मलाच ते अमन ॥ १२-४ ॥
अव्यक्तसक्तमन जे होताति क्लेश त्यांचिया देहीं ।
अव्यक्त गतीतें बा बहुत क्लेशेंचि पावती देही ॥ १२-५ ॥
माझ्या ठायीं सर्वहि कर्में जे अर्पुनीहि मत्पर ते ।
ध्याती उपासिती मज अनन्य त्यांचा न योग तो परते ॥ १२-६ ॥
कुंतीतनया त्यांचा दुःखप्रद मृत्युयुक्त भवसिंधू ।
अटवूनि उद्धरीं मी नेटें त्यांलागिं दीनजनबंधू ॥ १२-७ ॥
ठेवीं मजवरि मन तें पार्था बुद्धीसही न दे परतूं ।
निःसंशय मजमाजीं प्रवेशसी पांडवा अतःपर तूं ॥ १२-८ ॥
जरि शक्य न होय तुला मजमाजीं अचळ मन समाधानें ।
तरि तूं मज पावाया इच्छीं अभ्यास-योग-संधानें ॥ १२-९ ॥
अभ्यास न होय जरी तरि मत्प्रीत्यर्थ विहित कर्म करीं ।
करितां मदर्थ कर्में पावसि तूं सिद्धि आत्मसौख्य करीं ॥ १२-१० ॥
हेंही जरि तुज नोहे तरि करि माझाचि आश्रय स्वच्छ ।

जिंकुनि मन हें पार्था टाकावें सर्व कर्मफळ तुच्छ ॥ १२-११॥
ज्ञानहि अभ्यासाहुनि शुभकर तें ध्यान त्याहुनीहि पर ।
त्याहुनि कर्म-फळाचा त्याग त्यागेंचि शांति या उपर ॥ १२-१२॥
मैत्र क्षमी सदयही सर्वांभूतीं सदैव अद्वेष्टा ।
निर्मम निरहंकारी ज्याची दुःखीं सुखींहि सम चेष्टा ॥ १२-१३॥
संतत योग करी जो मनोजयानें सदैव संतुष्ट ।
अर्पी मन बुद्धि मला दृढ निश्चय भक्त जो मला इष्ट ॥ १२-१४॥
भीती लोक न ज्याला लोकां भीतो न जो मला भजतो ।
हर्ष क्रोध भय अणी उद्वेगें मुक्त आवडे मज तो ॥ १२-१५॥
जो शुचि दक्ष गतव्यथ निस्पृह जो पूर्ण सुगुणराशीन ।
सर्वोद्योगत्यागी तो प्रिय मज भक्त अति उदासीन ॥ १२-१६॥
हर्ष द्वेष नसे ज्या न करी शोक स्पृहा महाघोर ।
टाकी शुभाशुभां जो प्रिय मजला भक्तियुक्त तो थोर ॥ १२-१७॥
सम शत्रु मित्र ज्याला समान तैसाचि मान अपमानीं ।
त्यागी जो संगातें शीतोष्णीं सौख्यदुःख सम मानी ॥ १२-१८॥
निंदा स्तुति तुल्य जया गेह त्यागोनि भक्तिला सजला ।
संतुष्ट यथा लाभें मौनी स्थिरबुद्धि तो रुचे मजला ॥ १२-१९॥
पार्था हें धर्म्यामृत यथोक्त सद्भक्त यास जे भजती ॥
विश्वासू मत्पर ते प्रीति तयांची असेच मज बहु ती ॥ १२-२०॥

हें तव शरीर पार्था वर्णियलें क्षेत्र तत्त्ववेत्त्यानीं ।
त्यातें जाणें बा जो तोचि क्षेत्रज्ञ बोलिला त्यांनीं ॥ १३-१॥
क्षेत्रज्ञ सर्व भूतीं जो तो मी जाण न करि अनुमान ।
क्षेत्रक्षेत्रज्ञाचे ज्ञानचि जें होय तें मला मान ॥ १३-२॥
तें क्षेत्र होय जेथुनि जया विकारें जसेंहि संक्षेपें ।
तूं ऐक ज्या प्रभावें युक्त क्षेत्रज्ञ हेंहि संक्षेपें ॥१३-३॥
बहुधा वर्णित ऋषिंनीं सुज्ञानींहीं अनेकविध श्रुतिंत ।
तें ब्रह्मसूत्रपादें सहेतुकें निश्चयात्मकें गीत ॥ १३-४॥
पंचमहाभूतें हीं बुद्धी अव्यक्त अणि अहंकार ।
एकादशेंद्रियें ते पंच विषय करिति जे बहु विकार ॥ १३-५॥
संघात चेतना धृति वैरेच्छा दुःख सौख्यहि विकारी ।
क्षेत्र तुला संक्षेपें कथिलें हें तूं अहेसि अधिकारी ॥ १३-६॥
मानत्याग अदंभ क्षांति सरळता तशीचहि अहिंसा ।
स्थैर्य मनोजय शुचिता गुरुसेवा करिति ताप जे हिंसा ॥ १३-७॥
त्याग अहंकाराचा अणि वर्जन इंद्रियार्थ तोषांचें ।
दर्शन घडीघडीही जन्मजराव्याधिदुःखदोषांचें ॥ १३-८॥

सक्त न होतां असणें अलिप्त सर्वत्र दार सुत गेहीं ।
समचित्त नित्य होणें इष्टानिष्टोपपत्तियोगेंही ॥ १३-९ ॥
पार्था अनन्ययोगें अव्यभिचारी मतीस मम भजनीं ।
तैसी या जनसंगीं अप्रीति प्रीति पांडवा विजनीं ॥ १३-१० ॥
अध्यात्मज्ञानरती तत्त्वज्ञानार्थदृष्टि हें ज्ञान ।
कथिलें तुज म्यां पार्था जें या व्यतिरिक्त तेंचि अज्ञान ॥ १३-११ ॥
कथितों जें ज्ञेय तुला जाणुनियां अमृत पावती सत्य ।
तें ब्रह्म अनादि परम न स्थूल न सूक्ष्म तें असे नित्य ॥ १३-१२ ॥
सर्वत्र पाद कर जें तैसें सर्वत्र हो उदारा हे ।
सर्वत्र नयन शिर मुख सर्व व्यापूनि जें सदा राहे ॥ १३-१३ ॥
जें सर्वेंद्रियवर्जित करि सर्वेंद्रियगुण प्रकाशातें ।
सर्वाधार अस्क्तहि निर्गुण परि भोगितो गुणांशातें ॥ १३-१४ ॥
भूतीं अंतर्बाह्य व्यापक जें चरहि आणि जें अचर ।
न कळे सूक्ष्म म्हणोनी संनिधवर्ती तसेंहि दूरतर ॥ १३-१५ ॥
भिन्नहि नसोनि भूतीं भिन्नपरि राहतें समग्रासी ।
ते ज्ञेयहि भूतांचें पोषक अणि निर्मुनी जगत्रासी ॥ १३-१६ ॥
ज्योतींत ज्योति असें वर्णियलें पांडवा तमापरतें ।
ज्ञान ज्ञेय ज्ञानप्राप्यहि सर्वांतरीं न यापरतें ॥ १३-१७ ॥
ऐसें क्षेत्रज्ञान ज्ञेयहि उपदेशिलेंचि संक्षेपें ।
मद्भक्त जाणुनी हें मद्भावा पावती अविक्षेपें ॥ १३-१८ ॥
पुरुष प्रकृती दोनी जाण अनादी कधीं न उद्भवती ।
गुण आणि विकारहि ते प्रकृतीपासाव जाण संभवती ॥ १३-१९ ॥
हे प्रकृति काय कारण कर्तृत्वीं कथियली समज हें तूं ।
तैसा सुखदुःखाचा भोक्तृत्वीं पुरुष बोलिला हेतू ॥ १३-२० ॥
प्रकृतिस्थ पुरुष होउनि भोगि प्रकृतिगुणचि नेणुनी माया ।
अधमोत्तम योनिंतही कारण गुणसंग यास जन्माया ॥ १३-२१ ॥
द्रष्टा अनुमोदकही पुरुषहि भोक्ता महेश अणि भर्ता ।
यपरि बोलियला तो या देहाहुनि असे पर अकर्ता ॥ १३-२२ ॥
यापरि पुरुष प्रकृती जाणे गुणसहित त्यांत नर कोणी ।
असतांहि तो प्रपंचीं न पवे जन्मासि जाण परतोनी ॥ १३-२३ ॥
कोणी हृदयीं चिंती ध्यानें आत्म्यासि पाहती अपर ।
कोणी सांख्यें योगें पाहति कर्मेंहि तोचि योग पर ॥ १३-२४ ॥
कोणी हृदयीं ऐसें गुरुवचनें मात्र ऐकुनी पुरती ।
पार्था उपासिती ते श्रवणीं तत्परहि मृत्युतें तरती ॥ १३-२५ ॥
जितुकें जें का होतें पार्था स्थावर तसेंचि जंगम तें ।
क्षेत्रक्षेत्रज्ञाच्या योगें तें जाण वेदशास्त्रमतें ॥ १३-२६ ॥

राहे भूतीं जो सम भूत विनाशीं न नाश ज्या असतो ।
परमेश्वरासि यापरि पार्था जो पाहणार डोळस तो ॥ १३-२७ ॥
ईश्वर सम सर्वत्र स्थित पाहे तोचि या उरमगती ।
आपण अपुल्या घाता न करुनही पावतोचि परम गती ॥ १३-२८ ॥
कुंतीतनया कर्में करिती ते जाण सर्वही प्रकृती ।
आत्मा कर्ता न असें पाहे जो तोचि पाहतो सुकृती ॥ १३-२९ ॥
भूतांचें नानात्वहि एक्या ब्रह्मींच आणि विस्तार ।
ब्रह्मापासुनि पाहे पावे ब्रह्म प्रपंचविस्तार ॥ १३-३० ॥
निर्गुण अनादि म्हणुनी अविनाशी जाण सत्य परमात्मा ।
देहीं असुनि अकर्ता नित्य असें जण हेंचि माहात्मा ॥ १३-३१ ॥
जैसा सूक्ष्मत्वास्तव सर्वगतासी न लेपहि नभास ।
तैसा सर्वव्यापक देहीं आत्मा अलिप्त अवभास ॥ १३-३२ ॥
सकळहि लोकां जैसा करि कौंतेया प्रकाश हाच रवी ।
क्षेत्र क्षेत्रज्ञहि तो तैसा करुनी प्रकाश संचरवी ॥ १३-३३ ॥
ते ज्ञानचक्षुयोगें क्षेत्र-क्षेत्रांत उभय अंतर तें ।
मोक्षहि जनप्रकृतिचा जाणति पद परम त्या न अंतरतें ॥ १३-३४ ॥

पुनरपि परम ज्ञान ज्ञानोत्तम जें हरी कुबुद्धीतें ।
कथितों ज्यातें जाणुनि गेले मुनिवर्य परम सिद्धीतें ॥ १४-१ ॥
याचि ज्ञानाधारें ठेले मद्रूप होउनी सुमती ।
जन्मति सृष्टींत न ते प्रळयीं पार्था कधीं न ते भ्रमती ॥ १४-२ ॥
माझी गर्भाधान-स्थानप्रकृती असेचि तीमाजीं ।
गर्भाधान करीतों भूतांची होति तेथुनी राजी ॥ १४-३ ॥
सर्वहि योनीमाजीं जे जे होताति पांडवा देह ।
त्यांची माया प्रकृती बीजप्रद मी पिता न संदेह ॥ १४-४ ॥
सत्त्वरजस्तम हे गुण प्रकृतीपासोनि होति या देहीं ।
बांधिति अव्यय जीवा जेणें अपणासि मानितो देही ॥ १४-५ ॥
सत्त्व अनामय तेथें निर्मळ म्हणुनी असे प्रकाशकर ।
ज्ञान सुखाच्या संगीं बांधिति जीवा करोनियां निकर ॥ १४-६ ॥
करि अनुरागहि तृष्णा-संगापासोनि होति सत्त्व-रजें ।
कर्माच्या संगीं हा जीव असे बद्ध जाण त्याचि रजें ॥ १४-७ ॥
मोहक सर्वहि जीवा अज्ञानें होय पांडवा तम तें ।
अलस प्रमाद निद्रेमाजीं जीवास बांधुनी तमतें ॥ १४-८ ॥
करितें रज कर्मातें सत्त्व करी पांडवा प्रसादातें ।
ज्ञानातें आवरुनी करितें पार्था तम प्रमादातें ॥ १४-९ ॥
मोडुनि रज-तम होतो सत्त्वगुणोत्कर्ष हें मला गमतें ।

सत्त्व-तमा सोडुनि रज रज-सत्त्वा होय मोडुनी तम तें ॥ १४-१० ॥
ज्ञानप्रकाशहि करी करि सर्वेंद्रियगणीं प्रकाशातें ।
तेव्हां तें सत्त्वपदा जाणावें वाढलें अकाशातें ॥ १४-११ ॥
करवी कर्म सदा जें अशांति-लोभप्रवृत्तिसी भजतें ।
इच्छाही करित बहू वृद्धिंगत जाणिजे तदा रज तें ॥ १४-१२ ॥
अज्ञान अप्रवृत्ती प्रमाद अणि मोह जेधवां वाढे ।
तेव्हां जाण सख्या तूं तम तें वृद्धीस पावलें गाढें ॥ १४-१३ ॥
सत्त्वोत्कर्षामाजीं देही पावे जरी तनुप्रलया ।
तेव्हां पार्था अमल ब्रह्मविदांच्याचि पावतो निलया ॥ १४-१४ ॥
घे जन्म कर्मठायीं प्राणी कुंतीसुता विवृद्धरजें ।
तमवृद्धींत मरे जो तिर्यग्योनींत जन्म घे नर जें ॥ १४-१५ ॥
फल उत्तमकर्माचें निर्मळ सात्त्विक सुखासि जें फळतें ।
फळ अज्ञान तमाचें दुःख रजांचेंहि बोलती फळ तें ॥ १४-१६ ॥
लोभ रजापासुनि तो सत्त्वापासोनि होतसे ज्ञान ।
प्रसवेहि तमोगुण तो पार्था मोह प्रमाद अज्ञान ॥ १४-१७ ॥
उत्तम लोका जातो सत्त्वगुणी करुनि दोषनिःपात ।
मध्यें राजस असती जे तमवृत्तिस्थ त्यां अधःपात ॥ १४-१८ ॥
कर्ता गुणाहुनि दुजा नाहीं हें पाहणार जो पाहे ।
निर्गुण आत्मा जाणुनि पावे मद्भाव जाण बापा हे ॥ १४-१९ ॥
देहोद्भव त्रिगुण हे लंघोनि जाय जो सख्या देहीं ।
जन्म-जरा-मृति-दुःखें मुक्त ब्रह्मचि स्थितींत ना देही ॥ १४-२० ॥
उल्लंघुनी गुणांतें माधवराया मुनी कसा असतो ।
त्याचा आचार कसा कोण्या चिन्हेंकरोनि तो वसतो ॥ १४-२१ ॥
पार्था प्रकाश आणि प्रवृत्तिमोह प्रवृत्त हे असतां ।
न द्वेषित तो योगी इच्छीनाही प्रवृत्त हे नसतां ॥ १४-२२ ॥
वसत उदासीन असा होय गुणेंकरुनियां न चंचळ तो ।
गुण वर्तति हे ऐसें जाणुनि राहे कधी न जो चळतो ॥ १४-२३ ॥
ढेंकुळ धोंडा सोनें समजा निंदा स्तुतीहि ज्या सम ती ।
प्रिय अप्रिय सुखदुःखहि सम ज्या जो स्वस्थ धीर सरसमती ॥ १४-२४ ॥
सर्वारंभत्यागी ज्याला रिपु-मित्रपक्षहि समान ।
म्हणति गुणातीत तया ज्यास असे तुल्य मान अपमान ॥ १४-२५ ॥
सेवी मातें पार्था अव्यभिचारी धरोनि भावातें ।
त्रिगुणांतें उल्लंघुनि पावे तो ब्रह्मरूपभावातें ॥ १४-२६ ॥
अविनाशी जो मोक्षहि शाश्वत जो धर्म आणि जो निगम ।
निश्चित सुख जें त्याचा आश्रय मी भक्तिनेंच मी सुगम ॥ १४-२७ ॥

पर्णे छंदें ज्याला शाखा कालीहि ऊर्ध्व ज्या मूळ ।

अव्यय अश्वत्थ वदति जाणे जो त्या कळे श्रुतीमूळ ॥ १५-१ ॥
गुणवृद्ध विषयपल्लव शाखा अध ऊर्ध्व ज्यास विस्तरती ।
कर्मानुबद्धमूळें विश्वीं अध ऊर्ध्व करिति विस्तर तीं ॥ १५-२ ॥
न कळे त्याचें रूपहि आद्यंत स्थितिहि धुंडितां शास्त्रें ।
अश्वत्थरूढमूळें छेदोनीयां असंगदृढशस्त्रें ॥ १५-३ ॥
मग तें पद धुंडावें ज्यातें पावुनि न मागुते फिरती ।
आदीपुरुष भजे तो प्रवृत्ति तेथुनि जुनाट जे स्फुरती ॥ १५-४ ॥
मानेच्छा मोहरहित अध्यात्मज्ञान योग आरूढ ।
सुख दुःख द्वंद्व न ज्यां अव्यय पद पावतीच आरूढ ॥ १५-५ ॥
न रवी ना अग्नि शशी भासविती ज्यास बा तुझी आण ।
ज्यातें पावुनि न फिरति तें माझें परम धाम तूं जाण ॥ १५-६ ॥
प्राचीन जीवलोकीं मदंश जीव स्वरूप भोगार्थ ।
प्रकृतिस्थ मनःषष्ठां आकर्षी इंद्रियांसि हा अर्थ ॥ १५-७ ॥
तनुच्या त्यागीं ग्रहणीं देहाचा ईश जीव हीं साहा ।
घेउनियां जाय तसा सुमनाचा गंध वायु जैसा हा ॥ १५-८ ॥
चक्षु श्रोत्र घ्राण त्वक् जिव्हा पां हीं अधिष्ठान ।
पांडुसुता हीं पाहीं सेवी विषयां तनूंत निष्ठा न ॥ १५-९ ॥
देह त्यागी कैसा गुणयुक्त कसा तनूमधें गूढ ।
भोगी विषयांस कसा ज्ञानी हें जाणती न ते मूढ ॥ १५-१० ॥
योगी हृदयस्था या यत्नें पाहोनियां सुधी रमती ।
यत्नहि करितां अकुशल यासि न ते पाहती अधीरमती ॥ १५-११ ॥
जें तेज या रवींत प्रकाशवी या समग्र विश्वास ।
जें अग्नींत शशींतहि माझें तें तेज मानिं विश्वास ॥ १५-१२ ॥
तेजें पृथ्वींत रिघुनि भूतांचा भार मींच सोशीतों ।
रसमय चंद्रहि होउनि मी सकळां औषधींस पोशीतों ॥ १५-१३ ॥
प्राण्यांचें देहीं बा अग्नि असे जाण तूज सुचवीतों ।
प्राणापानांसह मीं चतुर्विधान्नांसि मींच पचवीतों ॥ १५-१४ ॥
ज्ञान स्मृति विस्मृतिही मजपासोनीच मी असें स्वस्थ ।
सर्वश्रुतिचाही मी वेद्यहि सर्वेंद्र सर्व हृदयस्थ ॥ १५-१५ ॥
पुरुषद्वय या लोकीं क्षर अक्षर ऐक सांगतों आतां ।
क्षर तो सर्वहि भूतें अक्षर कूटस्थ बोलिजे ताता ॥ १५-१६ ॥
अन्य क्षराक्षराहुनि मी उत्तम पुरुष म्हणति परमात्मा ।
लोकत्रयीं प्रशरवेशुनि धरि अव्यय ईश जो जग महात्मा ॥ १५-१७ ॥
क्षरभिन्न असें यास्तव उत्तम मी अक्षराहुनीच असें ।
यास्तव लोकीं वदीं पुरुषोत्तम मीच बोलताति असें ॥ १५-१८ ॥
पुरुषोत्तम मीच असें मनीं असंमूढ जाणतो मज तो ।

मग सर्व जाणता मज सर्वां भावेंहि तो मला भजतो ॥ १५-१९ ॥
हें गुह्य शास्त्र तुज म्यां कथिलें अनघा जनांस तारावया ।
कृतकृत्य आणि सुमती हें जाणुनि होय भारता राया ॥ १५-२० ॥

ज्ञानोपायीं निष्ठा ज्ञानस्वाध्याय चित्तशुद्धि महा ।
निर्भयता तप यज्ञहि पार्था तैसी अवक्रता दम हा ॥ १६-१ ॥
भूतदया अक्रोध त्याग अपैशून्य आसणें नित्य ।
शा ति अहिंसा मृदुता लजा स्थिरता अलोभ अणि सत्य ॥ १६-२ ॥
अद्रोह अमान तशी शुचिता तेज क्षमा धृति अहो ती ।
षड्विंशति गुण पार्था दैवी संपत्तिच्या नरा होती ॥ १६-३ ॥
अज्ञान आणि दंभ क्रोध क्रूरत्व दर्प अभिमानें ।
त्याच्या ठायीं असती ज्याला संपत्ति आसुरी माने ॥ १६-४ ॥
दैवी संपत्ति सदा मुक्त करी आसुरी करी बद्ध ।
न करीं खेद अहेसी दैवीसंपत्तिवंत तूं शुद्ध ॥ १६-५ ॥
भूतांचा उद्भव तो द्विविध असे दैव आणि आसुर तो ।
कथिला विस्तृत दैवहि आसुर ऐकावयासि चित्त रतो ॥ १६-६ ॥
नेणति प्रवृत्ति अणि ते निवृत्ति असुर-स्वभाव नर ते ।
शौचीं सत्याचारीं त्यांचें मानस कदापिही न रते ॥ १६-७ ॥
जग अप्रतिष्ठ आणिक अनीश्वर असत्य हेंचि जग मान्य ।
स्त्रीपुरुषोद्भव बोलति कामाविण हेतु मानिती नान्य ॥ १६-८ ॥
नष्टात्मे अल्पमती अनीश जग हेंचि दृष्टि धरणार ।
विश्वक्षयार्थ उपजति रिपु हे अत्युग्र कर्म करणार ॥ १६-९ ॥
दुष्पूर काम सेवुनि पार्था मद मान दंभ त्यास असे ।
मोहें दुराग्रही जे अशुचिव्रत ते प्रवर्ततीच असे ॥ १६-१० ॥
मरणावधि अतिशय जे चिंतेचा घेति फारसा लाहो ।
अतिसक्त कामभोगीं निश्चित पुरुषार्थ-भोग ज्याला हो ॥ १६-११ ॥
विषयांच्या भोगास्तव अन्यायें क्रोध-कामतत्पर ते ।
इच्छितिहि अर्थसंचय आशा-शत-पाशबद्ध ते पुरते ॥ १६-१२ ॥
हें अद्य प्राप्त मला मी याहि मनोरथासि साधीन ।
हें मज आहे प्रस्तुत हेंहि पुन्हा धन करीन आधीन ॥ १६-१३ ॥
हा शत्रु वधियला म्यां इतरहि मारीन चित्त तेंचि असे ।
ईश्वर मी भोगी मी बलवान् मी सिद्ध मी सुखीहि असें ॥ १६-१४ ॥
मी ज्ञानयुक्त आद्यहि मज ऐसा अन्य कोणता आहे ।
होमिन देईन सुखी होइन मोहें अशास्त्रमति पाहें ॥ १६-१५ ॥
जे मोहजाळ-बद्ध भ्रमति अनेका मनोरथीं नर कीं ।
आसक्त विषयभोगीं पडती ते जाण घोरतर नरकीं ॥ १६-१६ ॥

जे धन-मान-मदावृत मी अनुपम थोर ज्यांस हें माने ।
यज्ञाभासें यजिती अविधीनें यश-निमित्त दंभानें ॥ १६-१७ ॥
काम-क्रोध-अहंकृति बलदर्पांचें सदैव ते थोर ।
निजपरदेहीं मातें द्वेषिति दर्पा करोनिही घोर ॥ १६-१८ ॥
द्वेषी क्रूर नराधम जे अशुभ तयांसि नित्य संसारीं ।
आसुरयोनींमाजी टाकीतों जाण मीच कंसारी ॥ १६-१९ ॥
आसुरयोनी पावति जन्मोजन्मींहि मूढ अवनींत ।
मजला न पावुनी ते जन्मति त्याहूनि ते कुयोनींत ॥ १६-२० ॥
नरकद्वारें त्रिविध स्वनाश करि वश्य करुनि युक्तींनीं ।
यास्तव काम क्रोधहि हे शत्रू टाकिजेत कीं तींनीं ॥ १६-२१ ॥
हीं तीन तमोद्वारें यांपासुनि मुक्त जो सदा बापा ।
साधुनि आत्मश्रेयहि अणि पावे मोक्ष जाण निष्पापा ॥ १६-२२ ॥
जो शास्त्रविधानातें टाकुनि पार्था यथेच्छ आचरतो ।
तो सिद्धीतें न पवे न सुखी मोक्षींहि तो न संचरतो ॥ १६-२३ ॥
कार्याकार्य-विचारीं यास्तव शास्त्र प्रमाण तुज ताता ।
जाणुनि शास्त्रविधीतें कर्म करायासि योग्य हो आतां ॥ १६-२४ ॥

शास्त्रविधीतें नेणुनि लोकाचारेंच भक्तिनें यजिती ।
त्यांची निष्ठा कैसी सत्त्वातें कीं रजस्तमा भजती ॥ १७-१ ॥
लोकाचारीं मुक्ता वर्तति देहीं स्वभावजा भक्ती ।
सात्विक राजस तामस त्रिविधा घडतेचि ऐक बा युक्ती ॥ १७-२ ॥
सर्वांच्या सत्त्व-रज श्रद्धेचीही घडे तशी सोय ।
श्रद्धामय हा पुरुष श्रद्धा जी ज्यास तोचि तो होय ॥ १७-३ ॥
सात्विक देवगणांतें राजस ते यजिति यक्षरक्षांतें ।
भूत-प्रेत गणांतें इतरहि तामस धरोनि लक्षांतें ॥ १७-४ ॥
करिती घोर तपातें जन जे कुंतीसुता अशास्त्रोक्त ।
दंभाहंकाराश्रित आणिक ते काम राग बळसक्त ॥ १७-५ ॥
शोषिति निजपर देहीं भूतग्रामास जाण तूं सुज्ञा ।
पीडिति हृदयस्था मज त्या आसुर निश्चयें महा अज्ञा ॥ १७-६ ॥
सर्वांचा आहर त्रिविध प्रिय सत्य हें मनीं आण ।
तप आणि यज्ञ दानहि यांच्या भेदास ऐकुनी जाण ॥ १७-७ ॥
आयुष्यासह बळसुखहर्षप्रद करिति रोगसंहार ।
सस्नेह मनोज्ञ सुरस आवडती सात्विकांस आहार ॥ १७-८ ॥
दाहक अत्युग्र कटु क्षार तिखट रूक्ष जीव घेणारे ।
आहार राजसांचे रोगप्रद दुःख शोक देणारे ॥ १७-९ ॥
उच्छिष्ठ अशुचि गतरस शीळन्नीळे जयांसि अति घाण ।

आहार तामसांला आवडती पांडवा असे जाण ॥ १७-१० ॥
सात्त्विक यज्ञ फळेच्छा-विरहित एकाग्रचित्त संयुक्त ।
वेदाज्ञाचि यजावें करिजे तो म्हणुनि शास्त्रविध्युक्त ॥ १७-११ ॥
इच्छा धरुनि फळाची करिजे तो त्यांत दंभही असतो ।
भारतकुलावतंसा कौंतेया जाण यज्ञ राजस तो ॥ १७-१२ ॥
श्रद्धा मंत्र विधीही न ज्यांतही दक्षिणा नसे अन्न ।
पार्था सर्वज्ञ मुनी तामस हा यज्ञ बोलती भिन्न ॥ १७-१३ ॥
देवप्राज्ञद्विजगुरुपूजन तें ब्रह्मचर्य ना हिंसा ।
शौचार्जवसह म्हणती शारीरतपें न होय नरहिंसा ॥ १७-१४ ॥
अक्लेशकर वचन जें स्वाध्यायाचा सदैव अभ्यास ।
सत्य प्रिय हित म्हणती वाङ्मय तप हेंचि विदित सभ्यास ॥ १७-१५ ॥
चित्त प्रसन्न मौनहि मननिग्रह आणि भावसंशुद्धी ।
सौम्यत्वहि यापरि हें मानस तप बोलती महाबुद्धी ॥ १७-१६ ॥
परमश्रद्धेकरुनी या त्रिविध तपें मनोजयीं नर जे ।
त्यजुनि फळेच्छा तपती सात्त्विक तप जाण मिश्रितें न रजें ॥ १७-१७ ॥
सत्कार मान पूजा यांस्तव ज्यांचा असे समारंभ ।
म्हणती चंचल अध्रुव राजस तप हें जयामधें दंभ ॥ १७-१८ ॥
मोहें दुराग्रहें जें करिजे तें इच्छुनिछ परघात ।
अपुल्यातें पीडी जें तामस तप म्हणति दे अधःपात ॥ १७-१९ ॥
द्यावें म्हणवुनि दीजे प्रत्यपकारार्थ हें न करिजे तें ।
देशीं काळीं पात्रीं सात्विक हें दान म्हणति मुनि जे ते ॥ १७-२० ॥
प्रत्युपकारासाठीं फलइच्छेनेंहि चित्तखेदानें ।
जें जाण देइजे तें राजस ऐसेंचि म्हणति तीं दानें ॥ १७-२१ ॥
देशी काळीं पात्रीं न देइजे तें न ज्यांत सत्कार ।
तामस तें दान म्हणति करिजेतें जें करोनि धिक्कार ॥ १७-२२ ॥
ॐ तत् सत् त्रिपदांनी ब्रह्माचें नांव बोलिजे त्रिविध ।
तेणें पूर्वी केले देवद्विजयज्ञ सर्व हे विविध ॥ १७-२३ ॥
यास्तव ओमिति ऐसें उच्चारुनि जण वेदवेत्त्यांच्या ।
वर्तती यथाविधीनें तप-दान-मखक्रिया सदा त्यांच्या ॥ १७-२४ ॥
तदिती उच्छरुनियां फलसंधानहि मनीं न लक्षूनी ।
करिजेतेंहि सदा हें तप दान मखक्रिया मुमुक्षूंनीं ॥ १७-२५ ॥
सद्भावें साधुत्वीं पार्था सदिति प्रयोग हा होतो ।
तैसा प्रशस्त कर्मीं सच्छब्दचि योजिजेत आहो तो ॥ १७-२६ ॥
यज्ञीं तपींहि दानीं जे स्थिति सदिति म्हणति बा पाहा ।
ब्रह्मार्थ कर्म हें जें वदति सच्छब्द यास बापा हा ॥ १७-२७ ॥
अश्रद्धेनें केलें तपिजेलें होमिलें दिलें लोकीं ।

संन्यासाचें आणि त्यागाचें तत्त्वही महाबाहो ।
जाणों इच्छितसें मी सांग निराळें करोनि मज बा हो ॥ १८-१ ॥
कर्में सकाम त्यांचा त्यागचि संन्यास जणती सुज्ञ ।
सर्वहि कर्मफलाचा त्यागचि तो बोलती महाप्राज्ञ ॥ १८-२ ॥
कोणी सदोष कर्में त्यागावीं म्हणति पांडवा प्राज्ञ ।
कोणी म्हणती हें न त्यागावें दान कर्म तप यज्ञ ॥ १८-३ ॥
त्यागाविषयीं निश्चय ऐकावा भारता स्वचित्तींही ।
त्रिविध त्याग म्हणोनी वर्णियला जाण थोर जे तींहीं ॥ १८-४ ॥
दान तप यज्ञ कर्महि न त्यागावें अवश्य हें कार्य ।
मखदानतपें करुनी होती पावन मनीषि जे आर्य ॥ १८-५ ॥
कर्में सख्या करावीं संग त्यागोनियां फळासहित ।
ऐसें निश्चित पार्था संमत माझें असे जनास हित ॥ १८-६ ॥
न्यास नियत कर्माचा पार्था कोणासही कधीं नसतो ।
मोहानें केला जरि कर्माचा जाण त्याग तामस तो ॥ १८-७ ॥
दुःख म्हणुनि कर्मातें कायक्लेशाचिया भयें त्यागी ।
न पवे त्यागफळातें पार्था तो जाण राजस त्यागी ॥ १८-८ ॥
कर्म अवश्य करावें जाणुनि ऐसें करी नियत कर्म ।
त्यागुनि फळ अणि संगहि सात्विक तो जाण मान्य दे शर्म ॥ १८-९ ॥
कुशलीं सक्त नसे जो अकुशल न द्वेषि कर्म मेधावी ।
गतसंशय सात्त्विक तो त्यागी तेणेंचि मुक्ति शोधावी ॥ १८-१० ॥
कोणा देहीं कर्में समूळ ताकावया न सामर्थ्य ।
जो कर्मफळ त्यागी तो योगी बोलिजे असा अर्थ ॥ १८-११ ॥
अनिष्ट इष्टहि मिश्रहि त्या कर्माचें फल त्रिविध आहे ।
परलोकीं हें पावे सकाम संन्यासियां नसे बा हें ॥ १८-१२ ॥
हें कारणपंचक बा उक्त सकळ कर्मसिद्धि होयास ।
सांख्य महा-सिद्धांतीं मजपासुनि जाणिजे अहो यास ॥ १८-१३ ॥
बहुविध अनेक चेष्टा कर्ता अणि दैवहि अधिष्ठानें ।
नानाविध करण तसें जाणावीं पांच योगनिष्ठानें ॥ १८-१४ ॥
अन्यायें वा न्यायें काया-वाचा-मनेंहि निजकार्य ।
करिजें तें त्या लाहे हेतु सख्या पांच जाणती आर्य ॥ १८-१५ ॥
ऐसें असतां तेथें आत्मा केवळ मलाहि मूढपण ।
कर्ता म्हणोनि पाहे दुर्मति तो आंधळा स्वयें अपण ॥ १८-१६ ॥
ज्याची बुद्धी अलिप्तहि ज्याचे चित्तीं कधींहि न अहंता ।
तो या त्रैलोक्यातें मारुनियां जाण बद्ध न अहंता ॥ १८-१७ ॥

ज्ञान ज्ञेय ज्ञाता कर्माचा हा विधि त्रिविध आहे ।
कर्ता कर्म करण हा कर्माचा संग्रह त्रिविध पाहें ॥ १८-१८ ॥
ज्ञान अणि कर्मकर्ता त्रिविध असे त्रिगुणभेद या हेतू ।
सांख्यें हे सांगितले ऐकें पार्था यथार्थ पाहें तूं ॥ १८-१९ ॥
सर्वहि विभक्तभूतीं अव्यय अविभक्त एक जो भाव ।
पाहे ज्या ज्ञानानें सात्विक तें ज्ञान तूं मनीं भाव ॥ १८-२० ॥
भेदज्ञानें भिन्नचि सर्वां भूतीं अनेक भावातें ।
पाहे हें तुज वदतों राजस मीं ज्ञान-धर्म भावातें ॥ १८-२१ ॥
सर्वहि कारण तैसें सक्त अतत्त्वार्थ जें अहैतुक तें ।
अल्पहि जें कौंतेया तामस हें ज्ञानसाधना मुकतें ॥ १८-२२ ॥
राग-द्वेष विवर्जित अफलेच्छेनें असंगकृत विहित ।
सात्त्विक तें कर्म सख्या तेणें इहपरहि होतसे स्वहित ॥ १८-२३ ॥
विषयेच्छेनें केलें आणिक त्यामाजिं बहु अहंकार ।
बहु आयास जयांतहि कथिलें तें कर्म राजसाकार ॥ १८-२४ ॥
परिणाम क्षय हिंसा पौरुष हीं जें न पाहुनी करणें ।
मोहें कवण करी जें पार्था ते तामस क्रिया करणें ॥ १८-२५ ॥
धैर्योत्साह समन्वित पार्था निःसंग ना अहंकारी ।
होतां सिद्धि असिद्धि कर्ता सात्विक मनांत अविकारी ॥ १८-२६ ॥
रागी लोभी हिंसक हर्ष-विषादींच युक्त जो अशुची ।
कर्मफलेच्छू जो कां राजसकर्त्यास तुल्य ताप शुची ॥ १८-२७ ॥
प्राकृत अयुक्त उद्धत अपकारी अळसयुक्त जो शठ रे ।
खेदकर दीर्घसूत्री कर्ता तामस न साधनासि ठरे ॥ १८-२८ ॥
बुद्धीचाही धृतिचा भेद गुणें त्रिविध हाचि परिसावा ।
साकल्यें कथितों तुज ऐकुनि संशय समूळ निरसावा ॥ १८-२९ ॥
कार्याकार्य भयाभय निवृत्तिसहित प्रवृत्तिही शुद्धी ।
जाणेहि बंधमोक्षां पार्था ती जाण सात्विकी बुद्धी ॥ १८-३० ॥
धर्माधर्महि आणिक कार्याकार्यहि यथार्थ जे नेणे ।
सखया कुरुकुळटिळका जाणावी बुद्धी राजसी येणे ॥ १८-३१ ॥
अज्ञानावृत होउनि धर्म म्हणुनि मानिती अधर्मातें ।
विपरीत सर्व अर्थीं पार्था तूं बुद्धि जाण तामस ते ॥ १८-३२ ॥
प्राणेंद्रिय चित्तांचीं कार्यें रोधी जिणें न जे चुकती ।
चित्तैकाग्र्यें जी धृति अव्यभिचारीच जाण सात्त्विक ती ॥ १८-३३ ॥
धर्मार्थकामवर्गीं जीच्यायोगें सदा स्पृहा असती ।
जीच्या संगें फळही इच्छा धृति जाण तूंचि राजस ती ॥ १८-३४ ॥
दुर्मति जिणें न सोडी निद्रा मदही विषाद भय शोक ।
ती तामस धृति ऐसें कौंतेया म्हणति सुज्ञ जे लोक ॥ १८-३५ ॥

ऐकें भरतश्रेष्ठा सुख जें का त्रिविध सांगतों आतां ।
अभ्यासानें जेथें रमतां दुःखान्त पावतो ताता ॥ १८-३६ ॥
बा आधीं विषवत् जें परिणामीं अमृततुल्य जें टिकतें ।
स्वस्थपणें मन बुद्धी उपजे सुख बोलताति सात्विक तें ॥ १८-३७ ॥
विषयेंद्रियसंयोगें आरंभीं अमृततुल्य जें दिसतें ।
परिणामीं विषवत् जें जाणावें सुख सदैव राजस तें ॥ १८-३८ ॥
आरंभीं परिणामीं मोहकरी तें मनासि जें दुष्ट ।
निद्रा-प्रमाद-अळसें उपजे सुख म्हणति तामस स्पष्ट ॥ १८-३९ ॥
स्वर्गीं सुरलोकींही पृथ्वीमाजींहि पांडवा कोणी ।
प्रकृतीच्या त्रिगुणांनीं सोडविला जो असा नसे प्राणी ॥ १८-४० ॥
विप्र क्षत्रिय शूद्रहि वैश्यहि जे असति नित्य निजधर्मे ।
स्वप्रकृतिगुणें त्यांचीं दिसति निराळीं सदैव सत्कर्मे ॥ १८-४१ ॥
आस्तिक्य शौच आर्जव शम दम धारण तसेंचि शांतीचें ।
विज्ञान दान तप स्वाभाविक कर्म हें द्विजातीचें ॥ १८-४२ ॥
युद्धीं अपलायन तें धृति ईश्वरभाव दक्षता दानें ।
शौर्यहि तेजहि कथिलें स्वभावज क्षात्रकर्म वेदानें ॥ १८-४३ ॥
गोपालन वाणिज्य स्वाभाविक वैश्यकर्म आणि कृषी ।
परिचर्या शूद्राचें स्वाभाविक कर्म बोलतात ऋषी ॥ १८-४४ ॥
रत अपुल्याला कर्मीं पावे सिद्धीस मनुज भक्तिरसें ।
पावे स्वकर्मरत तो सिद्धि जसी पांडवा सख्या परिसें ॥ १८-४५ ॥
भूतप्रवृत्ति जेथुनि ज्याणें हें सर्वही असे व्याप्त ।
पूजुनि त्या निजकर्मे होती मनुजास सिद्धि ते प्राप्त ॥ १८-४६ ॥
विगुण स्वधर्महि बरा अनुष्ठिला चांगला न परधर्म ।
पावे दोषा न कदा स्वभावनियमी न टाकितां कर्म ॥ १८-४७ ॥
कर्मा दोषहि सहज क्षत्रियवर्या न सोडितांचि तरे ।
धूमें वह्नि जसा तो दोषें कर्मे समस्त आवृत रे ॥ १८-४८ ॥
निस्पृह आणि जितात्मा ज्याची सर्वत्र ते न सक्तमती ।
संन्यासानें पावे तोची नैष्कर्म्यसिद्धि उत्तम ती ॥ १८-४९ ॥
नैष्कर्म्यसिद्धि नर तो ब्रह्म कसा पावतो अविक्षेपें ।
जो परम ज्ञानाची निष्ठा तें ऐक तूंचि संक्षेपें ॥ १८-५० ॥
शुद्धमतीनें युक्तहि धैर्यें करुनी मनास रोधून ।
टाकुनि शब्दादि विषय रागद्वेषांस नित्य बांधून ॥ १८-५१ ॥
एकांत नित्य सेवी मितभोजी वाङ्मनासि तो रोधी ।
वैराग्ययोगयुक्त ब्रह्मध्यानीं सदैव अवरोधी ॥ १८-५२ ॥
काम क्रोध अहंकृति बलदर्प परिग्रहा करुनि शांत ।
ममताविरहित होउनि पावे मोक्षासि हाचि सिद्धांत ॥ १८-५३ ॥

सर्वां भूतीं पार्था स्वच्छमन ब्रह्मभूत जो सम हा ।
ज्याला न हर्ष शोकहि लाभे मद्भक्तिलाभ त्यास महा ॥ १८-५४ ॥
भक्तीनें मज जाणे जितुका जैसाहि मीं असें तत्त्वें ।
मग जाणुनियां मातें तदनंतर पावतो मला सत्त्वें ॥ १८-५५ ॥
सर्वहि कर्में करि जो ज्याला माझा सदैव अवलंब ।
पावे मम प्रसादें अव्यय शाश्वत पदासि अवलंब ॥ १८-५६ ॥
चित्तें सर्वहि कर्में माझे ठायीं समर्पुनी आहो ।
मतितोगाश्रित होउनि मत्परचित्तंत तूंहि संतत हो ॥ १८-५७ ॥
सर्वहि दुर्गें तरसी मच्चित्तें माझिया प्रसादानें ।
पावसि विनाश तरि तूं न जरी ऐकसि अहंकृतिमदानें ॥ १८-५८ ॥
धरुनि अहंकारातें मानसि न करीन मी कधींच रण ।
मिथ्या निश्चय तूझा करवील प्रकृति तूज आचरण ॥ १८-५९ ॥
स्वाभाविक कर्मानें बद्ध वृथा तूं दुराग्रहा धरिसी ।
मोहें न करूं इच्छिसि होउनि परवश परीच तें करिसी ॥ १८-६० ॥
सर्वां भूतांच्याही हृदयीं ईश्वर वसोनि चाळवितो ।
सर्वां भूतां तेव्हां यंत्र जसें सूत्रधार चालवितो ॥ १८-६१ ॥
जाई शरण तयातें सर्वां भावें न यामधीं भ्रांती ।
त्याच्या प्रसादयोगें शाश्वत पद थोर पावसी शांती ॥ १८-६२ ॥
गुह्याहुनि गुह्य असें कथिलें म्यां ज्ञान तूज निष्पापा ।
साकल्यें विवरुनियां जें इच्छिसि तें सुखें करी बापा ॥ १८-६३ ॥
सर्वांत गुह्य उत्तम माझें तूं वचन हें पुन्हा परिस ।
कथितों हित तुज यास्तव मज तूं बा प्रिय अतिप्रियापरिस ॥ १८-६४ ॥
मद्भक्त मन्मना हो वंदीं पूजीं मला बरें समज ।
करितों खरी प्रतिज्ञा असिस प्रिय मजहि पावसील मज ॥ १८-६५ ॥
टाकुनि सर्वहि धर्मां एक्या मातेंचि शरण ये युक्त ।
न करीं खेद मनीं तूं करितों मी सर्वपापनिर्मुक्त ॥ १८-६६ ॥
सेवाहीन अभक्ता तपहीनातेंहि रे न सांगावें ।
ईर्ष्या करि जो माझी पार्था त्याला कदा न सांगावें ॥ १८-६७ ॥
जो हें अतिगुह्य परम माझ्या भक्तांस आदरें पढवी ।
उत्तम भक्ति करोनि निश्चय माझ्या पदीं ध्वजा चढवी ॥ १८-६८ ॥
प्रियकर त्याहुनि माझा कोणी नाहीं न होय भूलोकीं ।
मजही प्रियतम त्याहुनि नाहीं दुसरा महींत अवलोकीं ॥ १८-६९ ॥
हा धर्मरूप अमुचा संवाद पढे सदैव जो सुमती ।
त्याणें ज्ञानमखें मी यजिलें होती मला असीच मती ॥ १८-७० ॥
धरुनी श्रद्धा नर जो ऐके ईर्ष्या त्यजोनि वीरा हे ।
तो पुण्यश्लोकांच्या शुभ लोकीं मुक्त होउनी राहे ॥ १८-७१ ॥

पार्था आयकिलें कीं एकाग्र मनेंचि हें मला सांग ।
अज्ञानमोह तूझा गेला कीं काय हें मला सांग ॥ १८-७२ ॥
गेला मोह स्मृतिही आली देवा तव प्रसादानें ।
निःसंदेह असें मी करितों संगर तव प्रसादानें ॥ १८-७३ ॥
संवाद श्रेष्ठाचा श्रीकृष्णाचा असाच पार्थाचा ।
अद्भुत रोमांचकरी आयकिला म्यां निधीच अर्थाचा ॥ १८-७४ ॥
श्रीकृष्णें योगेशें कथिला साक्षात्स्वयेंचि तो विजय ।
जो परम गुह्ययोग व्यासकृपें ऐकिलाचि मी विजय ॥ १८-७५ ॥
आठउनीयां राजा उठती कांटे पुनःपुन्हां देहा ।
श्रीकेशवार्जुनांचा अद्भुत संवाद पुण्य जो दे हा ॥ १८-७६ ॥
आठउनी श्रीहरिचें अत्यद्भुत रूप तें प्रमोदेंही ।
नवल बहुत मज राया उठती कांटे पुनः पुन्हां देहीं ॥ १८-७७ ॥
योगेश कृष्ण जिकडे जिकडे पार्थहि धनुर्धर उचित ।
तिकडे ऐश्वर्य विजय ध्रूवानीतीहि मन्मती खचित ॥ १८-७८ ॥

Encoded by Sunder Hattangadi sunderh at hotmail.com

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 3, 2010
http://sanskritdocuments.org